# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २३ मार्च, २०१५ / चैत्र २, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वित्त आणि नियोजन, वने मंत्री** | |
| **(२)** | **ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(३)** | **जलसंपदा मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८७**

---

**हंसराज नगरचा (ता.खामगाव, जि.बुलढाणा) जयपूर लांडे ग्रामपंचायतीमध्ये समावेश करण्याबाबत**

**(१) * ४०४१ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ९२८ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.सुरेंद्रकुमार वल्लभदास पुरोहीत, खामगांव, जि.बुलढाणा यांनी तसेच लोकप्रतिनिधी यांनी विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे दिनांक २२ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या निवेदनानुसार व पत्रानुसार हंसराज नगर हा भाग जयपूर लांडे या गावात समाविष्ट करुन घेणेबाबत मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे जयपूर लांडे या ग्रामपंचायतीने हंसराज नगरला ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट करणेबाबत ठराव मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हंसराज नगर हे त्रिशंकु क्षेत्र महसूली गांव म्हणून जाहीर करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी दिनांक १० डिसेंबर, २०१३ रोजीच्या पत्रानुसार जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे हा प्रस्ताव मागील ३ महिन्यापासून प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(५) हंसराज नगर (ता.खामगांव) या भागाला तात्काळ जयपूर लांडे या ग्राम पंचायतीमध्ये समाविष्ट करणेबाबत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना आदेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) होय.
(४) व (५) हंसराज नगर, ता.खामगाव या भागाला जयपूर लांडे या ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट करणेसंदर्भात नियमानुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, अमरावती यांचेमार्फत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव दि. २७.१.२०१५ रोजी उप अधिक्षक भूमि अभिलेख, खामगांव यांचेकडे पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्तावावर उप अधिक्षक भूमि अभिलेख, खामगांव यांचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर हंसराज नगर सह संजीवनी कॉलनी, संत तुकाराम कॉलनी, गोपाळकृष्ण कॉलनी इ. भागासाठी महसूली गाव स्थापन करणेबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील विकासकामांवरील कपात रद्द करुन विकासकामे करण्याबाबत**

**(२) * ३०४२ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याचे आर्थिक नियोजन बिघडल्याने चालू आर्थिक वर्षाअखेर म्हणजेच मार्चपर्यंत योजनेतील तरतूदींच्या ६० टक्केच रक्कम खर्च करण्याचे बंधन राज्य शासनाने घातल्यामुळे विकासकामांवरील खर्चात ४० टक्केच कपात होणार असल्याने रस्ते, सिंचन, पाणीपुरवठा आदी विकासकामांना विलंब होणार असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील विकासकामांवर करण्यात आलेली ४० टक्के कपात रद्द करण्यात येवून राज्यातील विकासकामे करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), व (३) योजनांतर्गत व योजनेतर निधी विभागांना वर्षाच्या सुरुवातीस उपलब्ध करुन देण्यात येतो. त्यास अनुसरुन योजनांतर्गत / योजनेतर निधी ६०% वितरीत करण्यात आला होता. वितरीत निधी व त्याचा झालेला विनियोग तसेच वर्षभर अनेक तातडीच्या किंवा अनपेक्षित मान्य करण्यात आलेल्या मागण्या या सर्व बाबींचा तसेच राज्याच्या उपलब्ध साधनसपंत्तीचा साकल्याने विचार करुन योजनांतर्गत अर्थसंकल्पीय निधीमध्ये वाढ करुन आता तो ७५ % व योजनेतर ८५ % इतका वितरीत करण्यात आला आहे. तसेच नियोजन विभाग (स्थानिक आमदार निधीच्या तरतूदीसह) आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय विभाग अंतर्गत विकास कामांच्या जिल्हा वार्षिक योजनांचा निधी १०० % वितरणास अनुमती देण्यात आली आहे.

याचबरोबर वेतन, मजूरी, निवृत्तीवेतन, विकास खर्च, दूरध्वनी, वीज, पाणी शुल्क, भाडेपट्टी व कर, शस्त्रे व दारुगोळा, पेट्रोल, तेल व वंगण, शिष्यवृत्या व विद्यावेतने, सहायक अनुदाने (वेतन), व्याज, कर्जाची परतफेड, यासाठीच्या योजनेतर व योजनांतर्गत निधी १००% वितरीत करण्यात आला आहे.

-----------------

**केकतपांगरी (ता.गेवराई) साठवण तलाव योजनेच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेबाबत**

**(३) * ३६६९ श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांनी दिनांक १७ जुलै, २०१२ रोजी केकतपांगरी साठवण तलाव योजनेला सुधारीत मान्यतेचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.जलसंधारण राज्यमंत्री यांनी या प्रस्तावास एक महिन्यात सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येईल असे आश्वासन दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी विधान परिषद सभागृहात दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेवराई तालुक्यातील (जि.बीड) दुष्काळ व तिव्र पाणी टंचाई लक्षात घेता सदर प्रस्तावास मान्यता देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी विधानपरिषद सभागृहात अर्धा तास चर्चेच्या वेळी या प्रकरणी वित्त विभागाने उपस्थित केलेल्या शेऱ्यांची पुर्तता एक महिन्यात करण्यात येऊन वित्त विभागास कळविण्यात येईल असे आश्वासन देण्यात आलेले आहे.

(३) सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावावर शासनाने उपस्थित केलेल्या शेऱ्यांची पुर्तता अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्या अहवालानुसार भुसंपादनापोटी पूर्वी रुपये १६१.६२ लक्ष प्रस्तावित करण्यात आलेली तरतूद अंतिम निवाड्यानुसार रुपये ३१३.१६ लक्ष झाली आहे. सदर शेऱ्यांच्या पूर्ततेचा अहवाल वित्त विभागास दिनांक ०४ मार्च, २०१५ रोजी सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्ह्यात कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू दूर करण्यासाठी आखलेल्या योजना कार्यान्वित करण्याबाबत**

**(४) * ४१४६ प्रा.जोगेन्द्र कवाडे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान**

**दुर्राणी, श्रीमती शोभाताई फडणवीस, ॲड.अनिल परब, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.राजेंद्र मुळक, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि.अमरावती) येथे कुपोषणामुळे ३६५ बालमृत्यूची नोंद झाली असून थंडीमुळे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान ४० आणि माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा दरम्यान २४ बालकांचे मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळघाट, धारणी, चिखलदरा (जि.अमरावती) येथे "जननी सुरक्षा योजना, माताबालक, पोषण आहार योजना,माहेर" यासारख्या योजना राबवून व कोटयवधी रुपये खर्च करुनही राज्यात हजार बालकांमागे बालमृत्यूदराचे प्रमाण ३६ इतके असतांनाही धारणी, चिखलदरा व मेळघाटामध्ये तोच दर ४२ इतका असून सन २०१४ मध्ये २६९ बालकांचा मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मातांकरिता राबविण्यात येणाऱ्या महत्वाकांक्षी इंदिरा गांधी मातृत्व योजनेअंतर्गत अमरावती जिल्हयास मिळालेले ५ कोटी २५ लाख रूपये वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ न मिळाल्याने वापरात आणलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मेळघाटातील बालमृत्यू वाढल्यामुळे नवीन वर्षात मेळघाट कुपोषणमुक्तीचा पॅटर्न राबवण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त पॅटर्नमध्ये वैद्यकीय त्रुटी पूर्णपणे दूर करण्यासह प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांच्या रिक्त जागा भरण्याबाबत विविध विभागांच्या समन्वयाने कुपोषणाचा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्याबाबतचा अंतर्भाव शासनाने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, माता व बालक यांसाठी आखलेल्या योजना न राबविणाऱ्या अधिकाऱ्यांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) तसेच आदिवासी कुपोषित बालके व माता यांचा मृत्यू टाळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येतआहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

मेळघाट परिसरात सन २०१४-१५ मध्ये डिसेंबर २०१४ अखेर २९१ बालमृत्यू झालेले आहेत. त्याचप्रमाणे नोव्हेंबर, २०१४ महिन्यात ३२ बालमृत्यू व डिसेंबर २०१४ मध्ये २२ बालमृत्यू झालेले आहेत.

मेळघाट भागात सन २०१३-१४ मध्ये अर्भक मृत्यूदर ३८ तर बालमृत्यू दर ९ आहे.

(३) अंशत: खरे आहे.

इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना (IGMSY) या १०० % केंद्र पुरस्कृत योजनेकरीता केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान खर्च करण्यास दि.०९.०२.२०१५ च्या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आलेली आहे

(४) व (५) हे खरे नाही.

बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी व कुपोषणाला आळा घालण्यासाठी शासनाकडून खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येते.

१) जननी शिशू सुरक्षा योजना
२) ग्राम बाल विकास केंद्रे
३) जिवनसत्व अ व जंतनाशक मोहिम
४) आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष
५) उपजिल्हा रुग्णालय धारणी येथे पोषण पुनर्वसन केंद्र
६) भरारी पथक योजना
७) नियमित लसीकरण कार्यक्रम
८) राष्ट्रीय बाल सुरक्षा कार्यक्रम

मेळघाट कार्यक्षेत्रात तालुका वैद्यकिय अधिकारी, वैद्यकिय अधिकारी गट अ, वैद्यकिय अधिकारी गट ब, आरोग्य सहाय्यक, सहाय्यीका, आरोग्य सेवक, सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता इ. ची एकुण मंजुर पदे ३२५ असुन भरलेली पदे ३११ आहेत वैद्यकीय अधिकारी गट-अ व गट-ब यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावरुन चालू आहे. तसेच उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही विभागीय स्तरावरुन चालू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

(७) माता व बालमृत्यू कमी करण्यासाठी प्रश्न भाग (४) व (५) मध्ये नमूद केलेल्या योजनांव्यतिरिक्त खालील उपाययोजना राबविण्यात येतात.

१) माता आरोग्य कार्यक्रमामध्ये गरोदर मातांची नोंदणी केली जाते. तसेच त्यांची तपासणी केली जाते व धनुर्वाताचे इंजेक्शन्स व लोहयुक्त गोळ्या दिल्या जातात.

२) त्याचबरोबर जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत गरोदर मातांना प्रसूतीपूर्वी, प्रसूतीदरम्यान व प्रसूतीपश्चात आणि ० ते १ वर्षे वयोगटातील बालकांना मोफत सेवा देण्यात येतात. यामध्ये लाभार्थ्यांना घरापासून आरोग्य संस्थेपर्यंत तसेच संस्थेतून परत घरी मोफत वाहतूक सुविधा देण्यात येते. आरोग्य संस्थेमध्ये दाखल झाल्यावर मोफत आहार, मोफत रोगनिदान, मोफत औषधे व उपचार करणे इत्यादी सुविधा देण्यात येतात.

३) जननी सुरक्षा योजनेअंतर्गत आरोग्य संस्थेत प्रसुतीच्या प्रमाणात वाढ होण्यासाठी राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कुटुंबातील गर्भवती मातांना प्रसूतीपश्चात आर्थिक लाभ देण्यात येतो.

बाल आरोग्य कार्यक्रमामध्ये बालकांसाठी नियमित लसीकरण, आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष या योजनांचा समावेश आहे.

तसेच कुपोषणाला आळा घालण्याकरीता राज्यात राजमाता जिजाऊ कुपोषण मिशनची स्थापना करण्यात आलेली असून याद्वारे कुपोषणाला आळा घालण्यासंबंधी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच VCDC / CTC द्वारे कुपोषित बालकांना आवश्यक

सुविधा व उपचार पुरविण्यात येऊन कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत नियमित आहाराव्यतिरिक्त पौष्टिक चिक्की, तसेच विविध प्रकारची आरोग्यदायी औषधे इ. चा पुरवठा अंगणवाडीतील लाभार्थींना निधीच्या उपलब्धतेनुसार केला जातो. आदिवासी क्षेत्रातील नवसंजीवनी क्षेत्रांतर्गत येणा-या प्रकल्पातील लाभार्थ्यांना अतिरिक्त पोषण मुल्य असणारा आहार पुरविण्यात येतो.
(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(५) * २६८६ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील पंचायत समितीची प्रशासकीय इमारत फार जीर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) सदर इमारतीचे नवीन बांधकाम करण्यासाठी गोंदिया जिल्हा परिषदेकडून प्रस्ताव सादर झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील प्रस्तावीत इमारतीच्या कामास मंजुरी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) गोंदिया जिल्हा परिषदे अंतर्गत एकूण ८ पंचायत समित्या असून पैकी, गोंदिया व सडक / अर्जुनी पंचायत समितींच्या प्रशासकीय इमारती सुस्थितीत आहेत. आमगाव, सालेकसा व देवरी पंचायत समितींच्या प्रशासकीय इमारती सर्वसाधारण स्थितीत असून, मोरगाव / अर्जुनी, गोरेगाव व तिरोडा पंचायत समितींच्या प्रशासकीय इमारती जीर्ण झालेल्या आहेत.

भंडारा जिल्हा परिषदेअंतर्गत लाखांदूर व साकोली पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारती जीर्ण झालेल्या आहेत.
(२) नाही.
(३) जिल्हा परिषदेकडून सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आल्यावर त्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील रोजगार हमी योजना, जलस्वराज्य, स्मशानभूमी, नळपाणी, अंगणवाडया या योजना अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत**

**(६) * ४०९२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासींच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या रोजगार हमी योजना, जलस्वराज्य, स्मशानभूमी, नळपाणी, अंगणवाडया या योजना अपूर्ण अवस्थेत असल्याबाबतची बाब माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने सदर योजना किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत,

(४) अद्यापी, कार्यवाही केली नसल्यास, होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, विक्रमगड तालुक्यातील विविध मंजूर योजनांचा आढावा घेण्यात आला आहे.

(३) विक्रमगड तालुक्यातील विविध मंजूर योजनातील मंजूर कामांपैकी काही कामे पूर्ण झालेली असून उर्वरीत प्रगतीपथावरील कामे माहे मे, २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कुमारी मातांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(७) * ३६७६ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कुमारी मातांचे पुनर्वसन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) होय, शासन स्तरावर कुमारी मातांच्या समस्येची दखल घेण्यात आली असून, सदरील मातांना व त्यांच्या बालकांना खालील योजनांचा लाभ देण्यात येत आहे.

(१) बाल संगोपन योजना.

(२) जिल्हा परिषद अंतर्गत शेळी वाटप योजना.

(३) यवतमाळ जिल्ह्यात सदर कुमारी मातांचे सर्वेक्षण करण्यात आले असून त्यांचे पुनर्वसनाकरीता स्वाधारगृह उभारण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) जिल्हा परिषदेच्या शेष फंडा अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या योजनाचा लाभ देण्यात येत आहे.

(३) सदर प्रकरणाबाबत मा.पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांचे विशेष पथकाद्वारे चौकशी करण्यात आली व त्यांचे अहवालानुसार कुमारी मातांना त्यांचेवर झालेल्या अत्याचारांबाबत विचारणा करण्यात आली असता, त्यांनी कोणतीही तक्रार दिलेली नाही. झरी येथील दोन कुमारी मातांनी संशयीत आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद नोंदविली आहे. सदर प्रकरणी जिल्ह्यातील कुमारी माता व त्यांचे मुलांच्या पुनर्वसनाकरीता मारेगांव तालुक्यातील मौजे टाकरखेडा गट क्र.३४ व ३५ येथील ५ एकर ई-क्लास जमिनीवर स्वाधार केंद्र उभारण्याची प्रक्रिया प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे थकीत मानधनाबाबत**

**(८) * ३९२७ श्री.सतिश चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४९०६६ ला दिनांक १४ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकात्मिक बालविकास सेवा योजनेत ८८२७२ अंगणवाडी सेविका व ८८२७२ मदतनीस काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत राज्यातील अंगणवाडी केंद्रामध्ये पर्यवेक्षक, ३ हजार ५३२ अंगणवाडी सेविका आणि ५ हजार २२३ मदतनिसांची, २४९ बालविकास प्रकल्प अधिकारी व सहाय्यक बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे कुपोषण निर्मुलन कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना मागील चार महिन्यांपासून पगार दिला नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दि.०१ एप्रिल, २०१४ पासून मान्य केलेले वाढीव मानधन अदा करणे बाबत शासनाने दि. ३० एप्रिल, २०१४ च्या शासन निर्णयानुसार निर्देशित केले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील अंगणवाडी सेविकांच्या थकित मानधन, नियमित वेतन यांसह विविध मागण्यांसाठी अंगणवाडी सेविका व मदतनीस महासंघाच्यावतीने दिनांक २ जानेवारी, २०१५ रोजी बीड, हिंगोली जिल्हा परिषद येथे मोर्चे काढले होते, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यासह बीड जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे थकीत मानधन अदा करणे तसेच त्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यामध्ये ऑक्टोंबर, २०१४ च्या मासिक प्रगती अहवालानुसार (MPR) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ९५३४१ अंगणवाडी सेविका व ९२०२३ मदतनीस काम करीत आहेत.
(२) राज्यामध्ये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत पर्यवेक्षिकाच्या ५८७, अंगणवाडी सेविकांची २१३४, मदतनीसांची ५४५२ तर बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांची ३२१ पदे रिक्त आहेत.
(३) नाही.
(४) होय.
(५) होय.
(६) बीड जिल्ह्यासह राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे थकीत मानधन अदा करण्यासाठी सन २०१५-१६ मध्ये वित्तीय तरतूद करण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच बीड जिल्ह्यासह राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक ०२.०३.२०१५ अन्वये दिनांक ०५.०८.२०१० व दिनांक १५.०९.२०११ चे शासन निर्णयानुसार सुरु असलेली अंगणवाडी सेविका, मदतनीस पदांबाबतची भरती प्रक्रिया दिनांक ३१.०३.२०१५ पर्यंत पुर्ण न केल्यास त्या भरतीप्रक्रिया रद्द करुन दिनांक १३.०८.२०१४ च्या शासन निर्णयानुसार पुर्ण करण्याचे निर्देश दिलेले आहेत.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मराठवाडा विभागातील कोल्हापूरी बंधाऱ्याच्या गहाळ झालेल्या दरवाजांची चौकशी करण्याबाबत**

**(९) * ३७७६ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, डॉ.सुधीर तांबे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १८२ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडयात शासनामार्फत बांधण्यात आलेल्या २७८६ कोल्हापूरी बंधाऱ्याच्या एकूण १,२९,७२२ दरवाजांपैकी सुमारे १९१४१ गहाळ झालेल्या दरवाजांबाबत गुन्हा नोंद होवून पुढील झालेल्या तपासाचे स्वरुप काय आहे,
(२) असल्यास, त्या तपासानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, गहाळ झालेल्या १५५४६ दरवाजाबाबत गुन्हा नोंद करणे व खातेनिहाय चौकशी करणेबाबतची कार्यवाही पूर्ण झाली असल्यास केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) मराठवाडा प्रदेशात जलसंधारण विभागामार्फत बांधण्यात आलेल्या २७८६ कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यापैकी १४८१ कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांचे १९१४१ दरवाजे चोरीस गेले असून ३५९५ दरवाजे चोरीस गेल्याबाबत गुन्हा नोंदविण्यात आलेला असून पोलीसामार्फत तपास चालू आहे.

(३) व (४) एकूण १९१४१ दरवाजांपैकी ३५९५ दरवाजांबाबत गुन्हा नोंद असून उर्वरित दरवाजांचे बाबत अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, औरंगाबाद यांचे यंत्रणेमार्फत प्राथमिक तपास व शोध सुरु आहे. तपासातील निष्कर्षानुसार गुन्हा नोंद करणे अथवा खातेनिहाय चौकशीचे नियोजन आहे. या संदर्भात सत्वर कार्यवाही करण्याबाबत अधीक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) औरंगाबाद यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याबाबत**
**वळण योजनांची प्रलंबित कामे पूर्ण करणेबाबत**

**(१०) * २८१० डॉ.अपूर्व हिरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले : तारांकित प्रश्न क्रमांक ४९१३२ ला दिनांक ९ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित असल्यामुळे पश्चिमवाहीनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याबाबतचे मांजरपाडासह इतर १७ वळण योजना तसेच दरसवाडी पोहोच कालवा,इत्यादी योजनांची केवळ १०/२० टक्के अपुर्ण कामे रखडल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच मांजरपाडा वळण योजनेसाठी सन २०१४-१५ मध्ये ७० कोटी अनुदान मंजुर असूनही केवळ सुप्रमा अभावी निधी खर्च करता येत नसल्याने या प्रकल्पाचे काम बंद पडले असून सदर प्रकल्पासाठी मंजुर निधी खर्च करण्यासाठी शासनाने परवानगी देण्याची माहे जानेवारी, २०१५ मध्ये मागणी करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मांजरपाडा - २ प्रकल्पाचे कामाची सद्यस्थिती काय आहे, तसेच मांजरपाडा-१ वळण योजनेचे काम सद्यस्थितीपावेतो किती टक्के पर्यंत झालेले आहे,

(४) तसेच मांजरपाडा - १ वळण योजनेचे काम अत्यंत संथगतीने होत आहे,हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) मांजरपाडा-२ वळण योजनेचा प्रकल्प अहवाल प्रशासकीय मान्यतेच्या कार्यवाहीत आहे.

मांजरपाडा-१ वळण योजनेच्या कामाची सद्यःस्थिती पुढीलप्रमाणे

१) माती धरण - ३० % पूर्ण
२) सांडवा संधानक - ७० % पूर्ण
३) मुख्य वळण बोगदा - ८९ % पूर्ण
४) जोड बोगदा - १०० % पूर्ण
५) उघडा चर - ९० % पूर्ण

(४) बोगदा, धरण व अनुषंगिक कामे सुप्रमा मान्यता व निधी उपलब्धतेनुसार एप्रिल २०१७ पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राई (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथील धामणी मध्यम प्रकल्प पूर्ण करण्याबाबत**

**(११) * ३८६३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राई (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर)) येथे होणाऱ्या ३.८५ हजार दशलक्ष घनफुट (टीएमसी) क्षमतेच्या धामणी मध्यम प्रकल्पासाठी सन १९९५-९६ च्या दर सुचीनुसार १२० कोटी ३० लाख रुपयांच्या किंमतीस दिनांक २४ डिसेंबर, १९९६ रोजी वा त्यासुमारास मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पावर माहे जून, २०१४ पर्यंत २९५ कोटी रुपये खर्च झाले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पात सध्या पाण्याचा थेंबही नसून सुधारित प्रशासकीय मान्यतेपासून तब्बल १८ वर्षे प्रकल्पाचे काम अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, १८ वर्षे प्रकल्पाचे काम रखडण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, प्रकल्प पूर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) होय.
(३) सन २००५ मध्ये प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सध्या काम अपूर्णावस्थेत आहे.
(४) वनजमीन व अभयारण्यातील क्षेत्र हस्तांतरण, खाजगी जमिनीचे भूसंपादन, पुनर्वसनातील विलंब, अपुरा निधी यामुळे प्रकल्पाचे काम रखडले आहे.
(५) निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरीत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**मौजे तळेगांव व उमरखेड पंचायत समिती (ता.जि.यवतमाळ) येथे इंदिरा आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांना घरकुलांचे वाटप करण्याबाबत**

**(१२) * ३४३२ श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तळेगांव (ता.जि.यवतमाळ) येथे इंदिरा आवास योजनेतील काही लाभार्थींना घरकुलाचा पहिला हप्ता देण्यात आला मात्र नंतरचे प्रतिक्षा यादीत नाव नसल्याचे सांगून तत्कालीन ग्रामसेवकाने त्यांना घरांचे पुढील हप्ते दिले नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच उमरखेड पंचायत समिती (ता.जि.यवतमाळ) अंतर्गत सन २०१० ते २०१३ या वर्षात इंदिरा आवास योजनेंतर्गत घरकुलांसाठी पहिला, दुसरा हप्ता घेवून घरांचे बांधकाम करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणातील चौकशीनुसार इंदिरा आवास योजनेंतर्गत घरांचे बांधकाम व घरकुलांचे पुढील हप्ते देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(५) असल्यास, तळेगांव इंदिरा आवास योजनेत गैरव्यवहार करणाऱ्या ग्रामसेवकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय,

मौजे तळेगांव (जि.यवतमाळ) येथील ग्रामसेवकाने चुकीच्या प्रतीक्षा यादीचा वापर करुन चुकीचे प्रस्ताव सादर केल्याने तीन कुटूंबांना पहिला हप्ता रु.३५,०००/- प्रमाणे रु.१,०५,०००/- चे वाटप करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.
उमरखेड, पंचायत समिती, जि.यवतमाळ अंतर्गत चौकशीअंती सन २०१० ते २०१३ या वर्षात इंदिरा आवास योजनेंतर्गत घरकुलांसाठी पहिला, दुसरा हप्ता घेवून घरांचे बांधकाम करण्यात आलेले आहे.
(४) मौजे तळेगांव (जि.यवतमाळ) येथील तीन कुटूंबांना पहिला हप्ता रु.३५,०००/- प्रमाणे अदा करण्यात आलेले रु.१,०५,०००/- पैकी रु.७०,०००/- वसूल करण्यात आले आहेत तर उर्वरित रु.३५,०००/- वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे. उमरखेड, पंचायत समिती जि.यवतमाळ अंतर्गत घरकुलांसाठी पहिला, दुसरा हप्ता घेवून घरांचे बांधकाम करण्यात आलेले असल्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) सदर प्रकरणामध्ये दोषी आढळलेले श्री.एस.डी.वीर, श्री.पी.टी.जाधव, ग्रामसेवक व श्रीमती एस.पी.पराते, स्थापत्य अभियांत्रिक सहायक, पंचायत समिती, यवतमाळ यांची एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता रोखण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### राज्यात पाणी वाटपबाबतचा अग्रक्रम कायम ठेवण्याबाबत

**(१३) * ३२०९ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाणी वाटपाबाबत प्रथम पिण्यासाठी नंतर शेतीसाठी व शेवटी उद्योगासाठी असा अग्रक्रम शासनातर्फे ठरविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी वाटपाबाबतचा अग्रक्रम कायम ठेवण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र राज्याची जलनीती २०११ च्या धोरणात अद्यापी कोणताही बदल झालेला नाही.

-----------------

### डोंगरी (मुंबई) येथे असलेल्या बालसुधारगृहाबाबत शासनाने करावयाची उपाययोजना

**(१४) * ३५७३ श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील डोंगरी येथे असलेल्या बालसुधारगृहात सध्या किती मुले आहेत,

(२) त्यापैकी किती मुलांना आतापर्यंत त्यांच्या आईवडीलांच्या ताब्यात देण्यात आले आहे,

(३) उर्वरित मुलांना त्यांच्या आईवडिलांच्या ताब्यात न देण्याची कारणे काय आहेत व या मुलांना त्यांच्या आईवडिलांच्या ताब्यात देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) डोंगरी येथे असलेल्या बालसुधारगृहात दि. ०८.०१.२०१५ रोजी २३० मुले व ७३ मुली असे एकूण ३०३ प्रवेशित हजर होते.

(२) दि. ०३.०३.२०१५ रोजी १३९ मुले व २४ मुली ह्या बाल कल्याण समिती, मुंबई शहर यांचे आदेशान्वये पालकांच्या ताब्यात देण्यात आलेल्या आहेत.

(३) उर्वरित मुलांपैकी ८० मुले व ३४ मुली ह्या संस्थेत आहेत त्यांचेबाबत गृहभेट अहवाल/चौकशीची कार्यवाही सुरू आहे. तसेच, ११ मुले व १५ मुली यांचे एस्कॉर्ट/ट्रान्सफर याबाबतचीही कार्यवाही सुरू आहे.

तसेच, अनाथ बालकांच्या पालकांना शोधण्याकरिता संस्थेमार्फत परिविक्षा अधिकारी, बालमानसोपचार तज्ज्ञ व पोलिस स्टेशन अंतर्गत कार्यरत स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधीमार्फत प्रयत्न केले जातात. त्यामुळे पालकांचा शोध लागून प्रवेशितांना पालकांच्या स्वाधीन करण्याची कार्यवाही संस्थेमार्फत करण्यात येत आहे.

-----------------

**नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यात बंद पडलेले सिकलसेल गर्भजल प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत**

**(१५) * २६४४ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये “सिकलसेल” रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाकडे “सिकलसेल” पीडितांमध्ये सर्व वयोगटातील रुग्णसंख्या किती याची आकडेवारी उपलब्ध नाही, त्याविषयी जनजागरण होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सिकलसेलसाठीचे गर्भजल प्रशिक्षण केंद्र बंद आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सिकलसेल आजार नियंत्रणासाठी शासनातर्फे काय उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे तसेच नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जनजागृती व सोल्युबिलीटी चाचणीची संख्या वाढल्याने निदान झालेल्या रुग्णांच्या संख्येत वाढ आढळून येत आहे.

(२) हे खरे नाही.

सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रमांतर्गत आढळून आलेल्या पीडितांमध्ये सर्व वयोगटातील रुग्ण संख्येची एप्रिल २००९ ते जानेवारी २०१५ पर्यंतची आकडेवारी उपलब्ध आहे. या कार्यक्रमांतर्गत गावागावांमधील ग्रामसभा, गटसभांमध्ये आशा तसेच स्वयंसेवी संस्थेच्या कार्यकर्त्यांमार्फत सिकलसेल आजाराची जनजागृती केली जाते.

(३) हे खरे आहे.

सन २०१२-१३ मध्ये गर्भजल चाचणी करण्यात येत होती. सदरचा प्रकल्प इंडियन कॉन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च अंतर्गत कार्यरत होता. सदर प्रकल्प डिसेंबर, २०१२ मध्ये संपुष्टात आला आहे. तदनंतर राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत हा प्रकल्प पुनःश्च कार्यान्वित करण्याबाबत वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग यांचेकडून कार्यवाही सुरु आहे.

(४) सिकलसेल या अनुवंशिक आजारावर नियंत्रण आणण्यासाठीचा कार्यक्रम राज्यातील २१) जिल्ह्यात राबविला जातो. या कार्यक्रमाअंतर्गत प्रामुख्याने १ ते ३० वयोगटातील व्यक्तींची सोल्युबिलीटी ही प्राथमिक चाचणी करुन या चाचणीत सकारात्मक आढळलेल्या व्यक्तींच्या रक्तनमुन्यांची इलेक्ट्रोफोरेसीस व एच.पी.एल.सी. चाचणी करुन तो रुग्ण आहे किंवा वाहक आहे याची खातरजमा करुन त्याला अनुक्रमे लाल किंवा पिवळे कार्ड दिले जाते. तसेच चाचणीत नकारात्मक निकाल आलेल्या व्यक्तींना पांढरे कार्ड दिले जाते. पिवळ्या व लाल कार्ड दिलेल्या विवाहयोग्य वयातील व्यक्तींनी आपआपसात विवाह टाळण्याबाबत समुपदेशन केले जाते.

नागपूर येथील वैद्यकिय महाविद्यालयात गर्भजल परिक्षण केंद्र सुरु करण्याबाबतची कार्यवाही वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**अकोट तालुक्यातील (जि.अकोला) मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या “बफर झोन” मध्ये अवैधरित्या सुरू असलेले खोदकाम**

**(१६) * २९०५ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट तालुक्यातील (जि.अकोला) मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या “बफर झोन” मध्ये अवैधरित्या खोदकाम सुरु असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासींच्या जमिनी भाडेतत्वावर आपल्या नावावर करुन कोटयवधीचे गौण खनिजांची चोरी सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन अनेकांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन जमिनीतील गौण खनिजाची विक्री करुन गैरव्यवहार केलेला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अनेक वर्षापासून सुरु असलेल्या बेकायदेशीर गौण खनिज चोरीप्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, संबंधित दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३), (४) व (५) अकोट तालुक्यातील मेळघाट व्याघ्रप्रकल्पाअंतर्गत अकोट वन्यजीव विभागाच्या नरनाळा अभयारण्यात कोणतेही अवैध खोदकाम सुरु नाही. तथापि अकोला वन विभागाचे कार्यक्षेत्र असलेल्या मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे बफर झोनमधील पोपटखेड व मलकापुर भिल येथील खाणीस बफर झोन अधिसूचीत होण्यापूर्वीच महसूल विभागामार्फत परवानगी देण्यात आली असल्याने सदर खाणी सुरु आहेत. दिनांक २७.०८.२०१४ रोजी जिल्हा खाणकाम योजना २०१४ अंतर्गत जिल्हास्तरीय समितीची जिल्हाधिकारी, अकोला यांचेकडे बैठक पार पडली असून सदर बैठकीत पोपटखेड व मलकापूर भिल येथील खाणी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**अंधश्रध्दा आणि गुप्तधनासाठी पक्षी आणि प्राण्यांचा बळी देणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(१७) * ४००१ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधश्रध्दा आणि गुप्तधनासाठी घार, घुबड, बेडूक आदी पक्षी आणि प्राण्यांचे बळी देण्याचे प्रकार गाव खेडयात तसेच नागपूर सारख्या शहरात मोठया प्रमाणावर होतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंधश्रध्देचा बळी ठरल्यामुळे घुबडाच्या कित्येक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अद्यापपर्यंत वन खात्याकडून यासंदर्भात कोणतीही कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) सन २०१३ मध्ये नागपूर वनवृत्तामधील भंडारा वनविभागात एक जिवंत घुबड व एका मृत घुबडाचे दोन डोळे व एक पंजा तसेच वर्धा वनविभागामध्ये वर्ष सन २०१४ मध्ये ३ जिवंत कासवे जप्त करण्यात आली आहेत

तथापि नागपूर शहरात असा प्रकार घडल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) वरील दोन्ही प्रकरणात संबधितांवर न्यायालयात खटला दाखल करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अल्प बचत संचालनालय, महसुल विभाग, पुणे येथील रिक्त पदांचा अनुषेश भरण्याबाबत**

**(१८) * ३२७९ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या अल्प बचत संचालनालयातील पदांच्या एकूण ४३ जागा असून केवळ २० अधिकारी कार्यरत असून कामाच्या ताणामुळे हा विभाग बंद करण्याच्या उद्देशाने सन २००९ मध्ये कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध तयार करण्यात आला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चांगला महसूल मिळवून देणाऱ्या विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याऐवजी शासन दुर्लक्ष करीत असून येथील पदांचा अनुशेष भरून काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास त्याचा तपशील काय आहे,

(४) सदर तपशिल उपलब्ध नसल्यास त्या मागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

अल्पबचत संचालनालय व त्याच्या अधिनस्त कार्यालयातील पदांच्या आढाव्याअंती एकूण १०८ पदांचा सुधारित आकृतिबंध दि. १५ मे २००९ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आला आहे. संचालनालयात ३७ अधिकारी कार्यरत आहेत.

(२) व (३) अल्पबचत संचालनालयाकडे सध्या फक्त एजन्सी नुतनीकरणाचे काम राहिले आहे. सदर अल्पबचत संचालनालय हे इतर विभागाकडे कामासह वर्ग करण्याचे प्रस्तावित असल्यामुळे रिक्त पदे भरण्यात येणार नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग येथील पाण्याचा दुष्काळ दूर करण्यासाठी करावयाची कार्यवाही**

**(१९) * ३०९२ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयनेचे अवजल मराठवाडा-मुंबई, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गालाही वळविणे अशक्यप्राय असल्याचा निष्कर्ष पेंडसे समितीच्या अहवालाच्या माध्यमातून स्पष्टपणे समोर आला असूनही मा.महसूल मंत्री यांनी सदर पाणी मराठवाडा-मुंबईकडे वळविण्याची घोषणा केली असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच कोकणातील रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पाण्याचा दुष्काळ दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) रत्नागिरी जिल्ह्यात १ मध्यम व ३६ लघू तसेच सिंधुदूर्ग जिल्ह्यात २८ लघू सिंचन प्रकल्प पुर्ण करणेत आले आहेत. तसेच रत्नागिरी जिल्ह्यात ३ मध्यम व २१ लघू पाटबंधारे प्रकल्प तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात २ मोठे, ५ मध्यम व ८ लघू सिंचन प्रकल्पांची कामे हाती घेण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अतिदुर्गम भागात हॅमरेडीओक्लब स्थापण्याबाबत**

**(२०) * २९६७ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अतिदुर्गम भागामध्ये मोबाईलला रेंज येत नसल्यामुळे डॉक्टर व रुग्णांना सरकारी आरोग्य केंद्राशी संपर्क साधता येत नसल्याने या भागात रुग्ण दगावतात म्हणून अशा ठिकाणी गिर्यारोहक वापरत असलेली हॅमरेडीओ सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिदुर्गम भागात हॅमरेडीओ क्लब स्थापण्यासाठी केंद्र शासनाकडून परवानगी मिळण्याबाबत राज्य शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, हॅम रेडिओ क्लब स्थापनेबाबत राज्य शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) हॅमरेडीओ सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत उपयोगितेचा अभ्यास करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात डेंगू, मलेरिया या आजाराच्या रुग्णांना "प्लेटलेट" उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२१) * २९४० श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.रामराजे नाईक-निंबाळकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ५२२ ला दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मोठ्या प्रमाणात डेंग्यु सदृश्य रुग्ण आढळले असून ३१ जणांचा मृत्यू झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यात डेंगु, मलेरिया या आजाराची साथ सुरू असल्याने रक्तातील "प्लेटलेट" या घटकाची मागणी तिपटीने वाढली असून त्यामुळे गरीब सामान्य रुग्णाची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे दिनांक ५ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, "प्लेटलेट" उपलब्ध करण्यासाठी व सदर साथींना आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) राज्यात माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात डेंग्यूचे एकूण १९ रुग्ण व जानेवारीच्या पूर्ण महिन्यात ८१ रुग्ण आढळले आहेत. मृत्यू निरंक आहे.
(२) राज्यात माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये डेंग्यूचे २०५१ रुग्ण आढळले असून ३० रुग्णांचे मृत्यू झाले आहेत. मलेरियाचे ४८६२ रुग्ण आढळले असून २ मृत्यू झाले आहेत.

राज्यातील ३१० परवाना धारक रक्तपेढयामार्फत माहे जानेवारी ते ऑक्टोबर, २०१४ या कालावधीत ७३८७३० Pack Cells, ३४०८७३ प्लेटलेट्स (आर.डी.पी.), २२०९९ (एस.डी.पी.), ६५७७३६ FFP व १७७५८ Cryo एवढे रक्तघटक उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच मागणीनुसार रक्त व रक्तघटकांचा पुरवठा गरजू रुग्णांना केला आहे.

(३) राज्यात एकूण ३१० परवाना धारक रक्तपेढ्या कार्यरत असून त्यापैकी २२९ रक्त पेढ्यांमध्ये प्लेटलेट बनविण्याची सुविधा उपलब्ध आहे. तसेच ९० रक्त पेढ्यांमध्ये एस.डी.पी.प्लेटलेट तयार करण्याची सुविधा उपलब्ध आहे. राज्य शासनाच्या ३४ जिल्हा स्तरिय रुग्णालय स्थित रक्त पेढ्यांपैकी २५ ठिकाणी प्लेटलेट तयार करण्याची सुविधा उपलब्ध असून उर्वरित ९ ठिकाणी सदर सुविधा उभारण्याचे कामकाज सुरु आहे.

राष्ट्रीय किटकजन्यरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डेंग्यू व मलेरिया नियंत्रणात आणण्यासाठी राज्यात पुढीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात आल्या व येत आहेत.

- आरोग्य कर्मचा-यांमार्फत नियमित ताप सर्वेक्षण.
- उद्रेकाच्या ठिकाणी जलद ताप रुग्ण सर्वेक्षण.
- तापरुग्णांचे रक्तनमूने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी.
- तपासणीअंती आढळून आलेल्या हिवताप रुग्णांना जंतूच्या प्रकारानुसार त्यांचा समूळ उपचार.
- डेंग्यू तापाच्या निदानासाठी जिल्हा रुग्णालय ठाणे येथे व्यवस्था.
- रुग्ण व्यवस्थापन.
- गप्पी मासे पैदास केंद्रे कार्यरत असून जिल्ह्यातील डासोत्पती स्थानांमध्ये गप्पीमासे सोडणे.
- हिवताप उद्रेकग्रस्त भागात तसेच हिवतापासाठी अतिसंवेदनशील निवडक गावांमध्ये किटकनाशकांची घरोघर फवारणी.
- किटकशास्त्रीय सर्वेक्षणांतर्गत पाणीसाठ्यांची तपासणी, डास अळ्या आढळून आलेले पाणीसाठे रिकामे करणे व रिकामे करता न येणा-या पाणीसाठ्यामध्ये टेमिफॉस ५० टक्के ई.सी. अळी नाशकाचा योग्य त्याप्रमाणात वापर.
- डेंग्यू उद्रेकग्रस्त गावात किटकनाशकाची धुरफवारणी.
- शासकीय आरोग्य संस्थांना आवश्यक तो औषधांचा पुरेसा पुरवठा तसेच जिल्ह्यांना किटकनाशके, अळी नाशके व साहित्यसामग्रीचा पुरवठा.
- उद्रेकग्रस्त ठिकाणी उपाययोजनांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा / विभागीय अधिका-यांच्या भेटी.
- विविध माध्यमांद्वारे जनतेस आरोग्य शिक्षण.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद जिल्ह्यात कुपोषित बालकांच्या वाढत्या प्रमाणावर आळा घालण्याबाबत**

**(२२) * ३०७६ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्याच्या ग्रामीण भागात ४ हजार १७७ बालके कुपोषित असल्याची धक्कादायक माहिती शासनाने केलेल्या सर्व्हेक्षणात माहे जाने, २०१५ मध्ये वा पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद महापालिकेच्या तालुका ठिकाणाच्या नागरी वसाहतीमध्येही कुपोषित बालकांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्याचेही उघडकीस आले आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाने कुपोषित बालकांसंदर्भात विविध योजना आखल्या असल्या तरीही कुपोषित बालकांचे प्रमाण वाढण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, अशा प्रकारास तातडीने आळा घालण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अशंत: खरे आहे. तथापि औरंगाबाद जिल्ह्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील माहे जानेवारी, २०१५ च्या मासिक प्रगती अहवालानुसार एकूण वजन घेतलेली बालके २६८८१६ इतकी असून त्यामध्ये सर्वसाधारण बालके २४७९१८ (९२.१६), मध्यम कमी वजनाची बालके १७०८२ (६.३५) व तीव्र कमी वजनाची बालके ३८१६ (१.४२) इतकी आहेत.
(२) औरंगाबाद महानगरपालिकेच्या क्षेत्रात ०३ नागरी प्रकल्प येत असून सदर प्रकल्पांमधील कुपोषणाची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| माहे/वर्ष | प्रकल्प | एकुण वजण घेतलेल्या बालकांची संख्या | सर्वसाधारण बालके | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके |
|---|---|---|---|---|---|
| डिसेंबर, २०१४ | नागरी-१ | १३९०४ | १०९८१ | ९५१ | १४६ |
| जानेवारी, २०१५ | | १५०८८ | १३९९८ | ९३८ | १४१ |
| डिसेंबर, २०१४ | नागरी-२ | ११४७३ | १०००१ | १२६७ | २०५ |
| जानेवारी, २०१५ | | ११७७२ | १०३०५ | १२६० | २०५ |
| डिसेंबर, २०१४ | नागरी-३ | ११६६७ | १०६४४ | ८७१ | १५२ |
| जानेवारी, २०१५ | | ११४८६ | १०५४३ | ८०३ | १४० |

वरील तपशिल पाहता कुपोषणाच्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते.
(३) कुपोषणाची कारणे खालीलप्रमाणे आहेत :-
१) जन्मत: एक तासाच्या आत स्तनपान न करणे.
२) स्तनपान न देणे किंवा अपूरे देणे
३) कमी वयात लग्न व अशा मातेच्या पोटी जन्माला येणारे मुल

४) वारंवार होणारे बाळंतपण

५) पुरक आहार खुप उशिरा सुरु करणे

६) आहारविषयक व मुलांच्या पोषणाविषयी गैरसमजूती अंधश्रध्दा व अपूरी माहिती

७) कुटूंबातील अपूरा व कमी प्रतीचा आहार

८) संसर्गजन्य आजार उदा. अतिसार, गोवर श्वसनसंस्थेचे आजार

९) गरीबी

१०) बेरोजगारी

११) असाक्षरता

१२) समाजाचा सहयोग नसणे

१३) गर्भधारणा झाल्यानंतर त्वरीत आरोग्य केंद्राशी संपर्क न साधणे.

१४) मातेच्या प्रसुतीपूर्व व प्रसुतीपश्चात हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असणे.

(४) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी पुरक पोषण आहार, आरोग्य व पोषण शिक्षण, पूर्व प्राथमिक शिक्षण, लसीकरण, संदर्भसेवा व आरोग्य तपासणी या सेवा पुरविण्यात येतात. तसेच ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात येते. त्याअंतर्गत मुलांच्या आहाराचे नियोजन करण्यात येते. त्यांची आरोग्य तपासणी करण्यात येते.

कुपोषणाला आळा घालण्याकरिता राज्यात राजमाता जिजाऊ कुपोषण मिशनची स्थापना करण्यात आलेली असून याद्वारे कुपोषणाला आळा घालण्यासंबंधी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच VCDC / CTC द्वारे कुपोषित बालकांना आवश्यक सुविधा व उपचार पुरविण्यात येऊन कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत नियमित आहाराव्यतिरिक्त पोष्टीक चिक्की, तसेच विविध प्रकारची आरोग्यदायी औषधे इ. चा पुरवठा अंगणवाडीतील लाभार्थींना निधीच्या उपलब्धतेनुसार केला जातो. आदिवासी क्षेत्रातील नवसंजीवन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या प्रकल्पातील लाभार्थ्यांना अतिरिक्त पोषणमुल्य असणारा आहार पुरविण्यात येतो. अंगणवाडीतील बालकांना आरोग्य सेवा पुरविण्याकरिता आरोग्य विभागाशी योग्य तो समन्वय साधण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे महागाव तालुका (जि.यवतमाळ) येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक आणि मुख्याध्यापक यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२३) * ३९०२ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे महागाव तालुक्यात (जि.यवतमाळ) येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक आणि मुख्याध्यापक यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच अधिकाऱ्यांचीही पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३), (४) व (५) होय, उच्चश्रेणी मुख्याध्यापकांची ६६ पदे मंजूर असून २२ पदे कार्यरत आहेत व ४४ पदे रिक्त आहेत. पदवीधर सहाय्यक शिक्षकांची ५५ पदे मंजूर असून ४३ पदे कार्यरत आहेत तर १२ पदे रिक्त आहेत. मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या याचिका क्र.२२०४/२०१४ व रिट याचिका क्र.४३२३/२०१४ मध्ये मा.न्यायालयाने स्थगिती दिलेली असल्याने पदवीधर सहा.शिक्षक व उच्चश्रेणी मुख्याध्यापकांची रिक्त पदे समायोजनाने भरता येत नाहीत.

गट शिक्षण अधिकारी, अधीक्षक, विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुखांच्या एकूण १९ मंजूर पदांपैकी एकूण ८ पदे रिक्त असून, सदर पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबई येथील डोंगरी बालसुधारगृहाच्या इमारतीची झालेली दुरवस्था

**(२४) * ३३०६ श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील डोंगरी बालसुधारगृहाची इमारतीची दुरवस्था झाल्याने कधीही कोसळण्याचा धोका निर्माण झाला असल्यामुळे तेथे राहणा-या मुलांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच इमारतीच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेण्यात आले असून सदरहू बालसुधारगृहातील मुलामुलींना अन्यत्र हलविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू इमारतीची पुर्नबांधणी त्वरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही, तथापि, दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी संचलित निरिक्षण /बालगृह, (मुलांचे/मुलींचे) उमरखाडी या संस्थेत जेलर्स बंगलो (अधिक्षक बंगला) नावाची इमारत आहे. सदर इमारतीमध्ये २००५ पासून मनुष्यवस्ती नसुन प्रवेशित सुध्दा रहात नाहीत. सदर इमारत पाडण्यासाठी संस्थेने सार्वजनिक बांधकाम विभागास प्रस्ताव पाठविला आहे.
(२) होय.
(३) व (४) चिल्ड्रेन्स एड सोसायटी संचलित सदर इमारत (जेलर्स बंगलो) पाडून तेथे नवीन इमारत बांधण्याकरिता सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात रु.२.३८ कोटी एवढी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

-----------------

**शासनाने सवलत देऊनही एस.टी. महामंडळाकडून सिकलसेल रुग्णांना प्रवासासाठी सवलत मिळत नसल्याबाबत**

**(२५) * ३८३९ श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने सन २०१४-२०१५ या वर्षासाठी सिकलसेल रुग्णांच्या उपचाराकरिता प्रवाशांसाठी १५ कोटी ११ लाख रुपयांची तरतूद केली असताना एसटी महामंडळ सिकलसेलग्रस्तांना प्रवास भाडे आकारत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच शासनाने आर्थिक तरतूद केल्याने सिकलसेल रुग्णांना मोफत प्रवास करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) राज्यातील सिकलसेल आजाराच्या रुग्णाला त्याच्या एका मदतनिसासह मोफत एस.टी. प्रवास सवलत योजनेची अंमलबजावणी दि. १० मार्च, २०१५ च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुण्यातील सुमारे १०९ आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शोषण होत असल्याबाबत**

**(२६) * ३६०० श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील सुमारे १०९ आश्रम शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शोषण होत असल्याची कबुली महिला व बालविकास विभागाच्या आयुक्तांनी माहे डिसेंबर, २०१४ च्या तिस-या आठवड्यात दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, कोणकोणत्या आश्रमशाळांमध्ये असे प्रकार झाल्याचे उघडकीस आले आहे, व यावर संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) व (३) आळंदी येथील वारकरी वसतिगृहातील मुलांच्या शोषणाबाबत वर्तमानपत्रात आलेल्या बातमीच्या अनुषंगाने विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली आळंदी, पुणे येथील १०९ वारकरी वसतिगृहांची तपासणी करण्यात आली आहे. सदर

वसतिगृहांमध्ये वास्तव्यास असणा-या मुलांना त्यांच्या पालकांनी धार्मिक व संस्कारक्षम शिक्षण मिळावे यासाठी स्वेच्छेने व स्वखर्चाने दाखल केलेले आहे. या वसतिगृहांना या विभागाकडून कोणतेही आर्थिक सहाय्य दिले जात नाही.

तसेच सदर तपासणीत ४२ संस्था नोंदणीकृत नसल्याचे तसेच काही संस्थांमध्ये स्वच्छता विषयक सुविधा अपु-या असल्याचे आढळून आले आहे.

यानुषंगाने बाल हक्क संरक्षण आयोगाने सर्व संबंधित संस्थांची सुनावणी घेऊन शासनास शिफारशी सादर केलेल्या आहेत.

सदर शिफारशींच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करणेस्तव आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना निर्देश देण्यात आले आहेत.

-----------------

**वाडा (जि.ठाणे) तालुक्यातील ऐनशेतरोड ते तरेपाडा अवचितपाडा ह्या रस्त्याचे काम अपूर्णावस्थेतच असल्याबाबत**

**(२७) * ३१७६ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.ठाणे) तालुक्यातील ऐनशेतरोड ते तरेपाडा अवचितपाडा हा रस्ता एकात्मिक आदिवासी प्रकल्प जव्हार यांच्या मार्फत मंजूर असून या रस्त्यासाठी तब्बल १२ लाखांचा निधी मंजूर झाला असून मात्र प्रत्यक्षात या रस्त्यावरील काम अपूर्णावस्थेतच ठेवून बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी संगणमत करून निधी खर्च करून उर्वरित निधी हडप केल्याचे माहे ७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी करून संबंधितावर गुन्हे दाखल करा अन्यथा आमरण उपोषण करण्याचा इशारा सामाजिक संघटनेचे अध्यक्ष शरद पाटील यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती दोषींवर शासनाने काय कारवाई केली आहे वा करणार आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार यांच्यामार्फत पत्र क्र.नियो/ २०१०/११/प्र.क्र./का ४ (२) २६४६ दिनांक २४/३/२०११ अन्वये रु. १२.०० लक्ष एवढ्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

प्रत्यक्षात कामाचे मुल्यांकन रु. ९,५५,४३२/- एवढ्या रक्कमेचे झालेले आहे.

मात्र निधीचा गैरव्यवहार केल्याचे खरे नाही.

(२) शिवक्रांती संघटनेचे अध्यक्ष श्री.शरद पाटील यांनी यासंदर्भातील आमरण उपोषण मागे घेतले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कल्याण (जि.ठाणे) तालुका पंचायत समिती कार्यालयाचे नूतनीकरण करण्याबाबत**

**(२८) * २७३० श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९५८ मध्ये लोड बेअरिंग पध्दतीने बांधलेल्या कल्याण (जि.ठाणे) तालुका पंचायत समितीच्या इमारतीचे १९६६ मध्ये विस्तारीकरण करण्यात आले असून वास्तुशास्त्र नियमानुसार या इमारतीचे आयुष्य संपले असून ५० वर्षापेक्षा अधिक कालावधी झाल्याने या कार्यालयाचे आयुर्मानही संपले असल्याची नोंद स्थावर मालमत्ता नोंदवहीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अडीच ते तीन लाख नागरीकांचे विकास केंद्र, जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत यांच्यामधील दुवा असलेल्या कल्याण पंचायत समिती कार्यालयाची दैनावस्था झालेली असून ८५ ते ९० कर्मचाऱ्यांना या जागेत कोंडवाड्याप्रमाणे काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कल्याण पंचायत समिती कार्यालयाचे नुतनीकरण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याप्रकरणी विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) सन १९५८ मध्ये बांधण्यात आलेल्या कल्याण पंचायत समितीच्या तळ मजल्यावरील इमारत बांधकामाचे वर्ष विचारात घेवून, त्याचे आयुर्मान पूर्ण झाल्याची नोंद स्थावर मालमत्ता नोंदवहीत घेण्यात आलेली आहे.

तथापि, सदर इमारत बांधकामालगत सन १९६६ विस्तारीकरण करण्यात आले असून, अस्तित्वातील इमारतीचे आयुर्मान वाढविण्याच्या दृष्टीने, सन १९८२ मध्ये आर.सी.सी. स्लॅब व बीम टाकून इमारतीचे मजबूतीकरण व पहिल्या मजल्याचे विस्तारीकरण करण्यात आले आहे.

(२) अशी बाब नाही.

(३) त्याठिकाणी नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम हाती घेण्याकरीता, महानगरपालिकेकडून जादा चटई क्षेत्र मंजूर करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणी नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाबाबत नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियानाबाबत**

**(२९) * २७९७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाश्वत शेतीसाठी पाणी व टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने परभणी जिल्ह्यात सन २०१५ दरम्यान जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अभियानातून तालुका निहाय कोण कोणती कामे मंजुर करण्यात आली आहेत,
(३) असल्यास, सदर तालुकानिहाय कामे पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, याप्रकरणी होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) या अभियानांतर्गत पाणलोट विकासाची कामे, साखळी सिमेंट बांध, जुन्या जलसंरचनाचे पुनर्जिवन करणे, अस्तित्वातील जलसंरचनाची दुरूस्ती करणे, विविध तलाव नुतनीकरण व क्षमता पुनस्थापीत करणे, विविध जलसंरचनामधुन गाळ काढणे, विहीर बोअरवेल पुनर्भरण, पाण्याचा कार्यक्षम वापर, पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकटीकरण करणे इ.कामे समाविष्ठ असुन गावनिहाय आराखडे अंतिम करणे व मंजुरीची कार्यवाही सुरू आहे.
(३) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात परभणी जिल्ह्यास महात्मा फुले जल व भुमीसंधारण अभियान अंतर्गत रुपये २८०.११ लक्ष, साखळी सिमेंट बंधारे रु.१४१६ लक्ष एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमा अंतर्गत रु.५९८ लक्ष RIDF -मेगा पाणलोट विकास कार्यक्रम रु.४०२ लक्ष व कोरडहू शेती अभियान ४४.७० लक्ष असा एकुण रु.२६६८.८१ लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

सन २०१५-१६ करिता रु.२५४६ लक्ष जिल्हा नियोजन विकास समिती मार्फत उपलब्ध करुन देण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील बालगृहासाठी पुरेसा व विहित वेळेत निधी मिळण्याबाबत

**(३०) * ४३७९ श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील बालगृहासाठी लागणारा निधी तुटपुंजा असून तो वेळेवर मिळत नसल्याने बालसुधारगृहातील मुलांचे हाल होत असून त्यांना वेळेवर जेवण तसेच आजारी पडल्यास वेळेवर औषध उपचार मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बालसुधारगृहासाठी पुरेसा व विहित वेळेत निधी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, बालगृहासाठी निधी देण्यास व दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही,

(२) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी राज्यातील बालगृहाच्या परिपोषण अनुदानासाठी रु.३५ कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे. वित्त विभागाच्या आदेशानुसार त्यापैकी ७५ टक्के रक्कम रु. २६.२५ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे नियोजन व वित्त विभागास रु.६९ कोटीचा पुरवणी मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला होता, तथापि, सदर प्रस्तावावर वित्त विभागाने जितक्या बालकांची आधारकार्ड आहेत. त्याप्रमाणात विभागाने अनुदान घ्यावे व उर्वरित अधिक शहानिशा करुन प्रस्ताव द्यावा, असे नमूद केले असून त्याअनुषंगाने माहिती मागविण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**फलगांव (ता.नांदगांव खडेश्वर, जि.अमरावती) ग्रामपंचायतीमध्ये स्मशानभूमीच्या रस्त्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३१) * ४४३७ श्री.राजेंद्र मुळक, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फलगांव (ता. नांदगांव खडेश्वर, जि. अमरावती) ग्रामपंचायतीमध्ये सन २०१२-१३ मध्ये जनसुविधेअंतर्गत गावात स्मशानभूमीकरिता रस्त्यासाठी मंजूर करण्यात आलेला ५ लाखाचा निधी पंचायत समितीअंतर्गत थेट ग्रामपंचायत खात्यात जमा करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरपंच यांनी या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांना कोणतीच माहिती नसल्याचे नमूद केले असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी गैरव्यवहार झाल्याने याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) तत्कालीन ग्रामसेवकाने विद्यमान कंत्राटी ग्रामसेवकाला जनसुविधा योजनेचा प्रभार न दिल्यामुळे ग्रामसेवक व सरपंच यांनी चौकशी दरम्यान या प्रकरणासंबंधी माहिती नसल्याचे संयुक्त सहीनिशी लेखी बयान सादर केलेले आहे.

(३), (४) व (५) गैरव्यवहार झालेला नाही. तथापि, तत्कालीन ग्रामसेवकाने जनसुविधा योजनेचा प्रभार कार्यरत ग्रामसेवकाकडे न दिल्याने त्याचे विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

-----------------

**नंदुरबार जिल्हा परिषदेत वर्ग-१ व वर्ग-२ च्या प्रमुख अधिका-यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३२) * ४४७४ श्री.चंद्रकांत रघुवंशी, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्हा परिषदेत वर्ग-१ व वर्ग-२ च्या प्रमुख अधिका-यांची ८० हून अधिक पदे रिक्त असल्यामुळे आदिवासी विभागातील अनेक विकास कामे रखडली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासींची रखडलेली विकास कामे तातडीने पूर्ण होण्यासाठी वर्ग-१ व वर्ग-२ ची रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) या विभागाच्या अधीनस्त महाराष्ट्र विकास सेवेतील वर्ग-१ व वर्ग-२ मधील एकूण १९ मंजूर पदांपैकी ३ पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्याची कार्यवाही चालू असून लवकरच सदर पदे भरण्यात येतील.

जिल्हा परिषदेकडील विविध योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम २३९ नुसार महाराष्ट्र विकास सेवा वगळून इतर वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे संबंधित प्रशासकीय विभागांमार्फत निर्माण करण्यात आली असून ती संबंधित प्रशासकीय विभागाकडून भरली जातात. इतर प्रशासकीय विभागांची ७५ पदे रिक्त आहेत. जिल्हा परिषदेतील अधिका-यांची सर्व रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत संबंधित प्रशासकीय विभागांना वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. दि. १२.३.२०१५ रोजी पुन्हा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना अधिक लोकाभिमुख करण्याबाबत**

**(३३) * ४८०५ श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना अधिक लोकाभिमुख होण्यासाठी या योजनेची व्यापकता वाढविण्याची तसेच अन्य काही सुचनांवर शासनाने विचार करण्याची लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नागपूर विभागातील अर्नेजा हार्ट इन्स्टिटयुटसह काही खाजगी रुग्णालयांची दोन वर्षापासून ८ कोटी रुपयांची देयके शासनाने न दिल्यामुळे सदर खाजगी रुग्णालयांनी उक्त योजनेच्या शस्त्रक्रिया करण्यास नकार दिल्याची बाब दिनांक २८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) मधील थकीत देयकांबाबत नागपूरच्या आरोग्य उपसंचालक कार्यालयाने आरोग्य सेवा संचालनालयास वेळोवेळी स्मरणपत्रे पाठविलेली आहेत, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

(२) अर्नेजा हार्ट इन्स्टीटयुटसह नागपूर परिमंडळातील रुग्णालयांची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत केलेल्या उपचारांची थकबाकी प्रलंबित नसुन जुन्या जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट रुग्णालयांची मार्च, २०१४ अखेर रु. १२.१३ कोटी एवढी थकबाकी प्रलंबित होती. त्यापैकी फेब्रुवारी, २०१५ अखेर रु. ५.१९ कोटी एवढी रक्कम मंजुर करण्यात आली असून आज दिनांकास रु. ६.९४ कोटी एवढया रक्कमेची देयके प्रलंबित आहेत. त्यामध्ये अर्नेजा हार्ट इन्स्टीटयुट या रुग्णालयाच्या रु. २१.३४ लाख एवढया प्रलंबित देयकांचा समावेश आहे.

जुनी जीवनदायी आरोग्य योजना बंद झाली असून राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत नागपुर परिमंडळातील रुग्णालयांनी पैसे अदा न केल्यामुळे उपचारास नकार दिल्याची तक्रार प्राप्त नाही.

(३) होय.

(४) जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात उपलब्ध तरतुद विचारात घेऊन संबंधित रुग्णालयांची देयके अदा करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच उर्वरित प्रलंबित देयके अदा करण्यासाठी निधी उपलब्ध होण्यासंबंधाने वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले कामळेवीर बाजार ते होडवाडा चव्हाटा रस्त्याचे काम करण्याबाबत**

**(३४) * ४९८१ श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले कामळेवीर बाजार ते होडवाडा चव्हाटा रस्त्याचे काम करण्याबाबत अनेकवेळा निवेदने देवूनही सदर रस्त्याचे काम अद्याप करण्यात आले नाही हे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याचे काम तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) प्रश्नांकित रस्त्याबाबत जिल्हा परिषद सिंधुदु र्गकडे कोणतेही निवेदन प्राप्त नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील कामगार विमा रुग्णालयांची दुरवस्था दूर करण्याबाबत**

**(३५) * ५०१० श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

((१) राज्यात एकूण १३ कामगार विमा योजनेची रुग्णालये असून त्यापैकी अंधेरी येथील एक रुग्णालय ३ वर्षापूर्वी केंद्र शासनाच्या ताब्यात देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उर्वरित १२ रुग्णालये चालविण्यासाठी राज्य शासनावर त्याचा मोठा आर्थिक बोजा पडत असून गेली दहा वर्षात केंद्र शासनाने सुमारे १५०० कोटी रुपयांचे अनुदान अद्याप दिलेले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालये राज्यशासनाने चालवावीत अशी सूचना केंद्र सरकारने केल्याने सदर रुग्णालयांची दुरावस्था झाल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) तसेच राज्यात मुंबई, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, पुणे इ. मोठया औद्योगिक क्षेत्रातील इएसआयसी रुग्णालयांचे सुपर स्पेशालिटी रुग्णालयामध्ये रुपांतर करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर राज्य कामगार विमा रुग्णालये आर्थिक क्षमतेने कमी पडत असल्याने त्याचा परिणाम कामगार रुग्णांवर होत आहे, हेही खरे आहे काय,

(६) असल्यास, केंद्र शासनाकडून त्वरीत अनुदान मिळण्याबाबत राज्य शासनाने कोणते प्रयत्न केले वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

राज्य कामगार विमा योजना केंद्र शासनाकडे हस्तांतरीत करण्याबाबतचा प्रश्न प्रलंबित राहिल्यामुळे गेल्या ८ वर्षात केंद्र शासनाकडून अनुज्ञेय असलेली ८९० कोटी रक्कम राज्य शासनाच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूदी अभावी खर्च न होऊ शकल्याने प्राप्त होऊ शकली नाही.

(३) होय,

मा. केंद्र राज्य मंत्री (श्रम व रोजगार) यांनी डिसेंबर, २०१४ मध्ये मुंबई भेटीच्या वेळेस पत्रकार परिषदेत राज्य कामगार विमा योजना राज्य शासनाने चालवावी असे जाहिर केले आहे. तथापि, याबाबत केंद्र शासनाकडून अधिकृत पत्र व्यवहार प्राप्त नाही

(४) होय, हे खरे आहे.
(५) अंशतः खरे आहे.

सुपर स्पेशालिटी उपचारासाठी राज्य कामगार विमा महामंडळामार्फत राज्यात एकूण १५० खाजगी रुग्णालयांशी सामंजस्य करार (टाय-अप) करण्यात आले असून विमा रुग्णांना सदर सेवा तत्परतेने पुरविल्या जात आहेत.

राज्य शासनाकडून राकावि योजनेकरिता पुरेशी आर्थिक तरतूद होत नसल्याने राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांमार्फत पुरविण्यात येणा-या सेवा हया उपलब्ध अनुदानाच्या प्रमाणात देण्यात येत आहेत. सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकामध्ये अधिकच्या निधीची मागणी केली आहे.

(६) राज्य कामगार विमा महामंडळाकडून एकूण ७५० कोटी अनुदान प्राप्त करुन देण्याबाबत शासनास प्रस्ताव प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयास पाठविण्यात येत आहे.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या जिल्हा परिषद कृषि अधिकारी पदाच्या लेखी परिक्षेबाबत

**(३६) * ५४२८ श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा परिषद कृषि अधिकारी (गट-क) पदाची लेखी परिक्षा दिनांक २ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच या परिक्षेची उत्तरतालिका वेबसाईटवर जाहीर न करता व हरकती न मागविता अनधिकृतपणे या परिक्षेचा निकाल दिनांक ५ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास जाहीर करण्यात आला, हे खरे आहे काय,
(३) या सर्व प्रक्रियेमध्ये काही प्रश्नांची उत्तर चुकीची असून निवड प्रक्रियाही चुकीच्या पद्धतीने करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग १ ते ३ बाबत शासनाने चौकशी केली वा करण्यात येत आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,
(२) व (३) नाही.

दिनांक ०२/११/२०१४ रोजी लेखी परिक्षा पार पडल्यानंतर त्याच दिवशी दुपारी उत्तरतालिका संकेतस्थळावर प्रसिध्द करुन २४ तासांच्या कालावधीत उमेदवारांनी हरकती लेखी स्वरुपात देण्याबाबतच्या सुचना परिक्षाकेंद्रावर नोटीस बोर्डावर लावण्यात आल्या. तसेच लेखी परिक्षेच्या वर्गात यासंदर्भातील सूचना वाचून दाखविणेत आल्या आहेत. व त्यानुसार विहीत कालावधीत लेखी आक्षेप प्राप्त न झाल्याने दिनांक ०४/११/२०१४ रोजी निकाल जाहीर करुन निवड-समितीने नियमानुसार पात्र उमेदवारांची निवड केलेली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अँटी रेबीज सिरम ही लस शासकीय रुग्णालय व खाजगी दुकानांमध्ये उपलब्ध करण्याबाबत**

**(३७) * ५६२९ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिसाळलेला कुत्रा किंवा वन्यप्राणी चावल्यास रुग्णावर उपचार करणारी एआरएस (अँटी रेबीज सिरम) या लसीचा राज्यात तुटवडा निर्माण झाला आहे तर दुसरीकडे ही लस बंद होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही लस शासकीय रुग्णालयात तसेच खाजगी दुकानांमध्ये सहज उपलब्ध होण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अखत्यारित असलेल्या रुग्णालयांमध्ये एआरएस (अॅन्टी रेबीज सिरम) या औषधाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी ग्रामीण भागात अग्निशमन केंद्र स्थापन करण्याबाबत**

**(३८) * ५७४७ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील दोन वर्षात भिवंडी ग्रामीण भागात लागलेल्या आगी आणि दुर्घटनांमध्ये २० कामगारांचे मृत्यू झाले आहेत तसेच आजपर्यंत २१४ लहान - मोठ्या आगीच्या घटना घडल्या असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडीच्या ग्रामीण भागात स्वतंत्र अग्निशमन दल नसल्यामुळे तेथे पालिकेची अग्निशमन वाहने पाठवावी लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालिकेकडे पुरेशी वाहने नसल्याने ठाणे, कल्याण येथून सुध्दा गाड्या आणि जवान मागवावे लागतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भिंवडीच्या ग्रामीण भागात स्वतंत्र अग्निशमन केंद्र स्थापन करण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) भिवंडी ग्रामीण भागात मागील दोन वर्षात लहान मोठया १५५ आगीच्या घटना घडल्या असून, त्यामध्ये ८ व्यक्ति मृत व ११ व्यक्ति जखमी झाल्याची नोंद भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेकडे आहे.

(२) व (३) होय.

(४) राज्याच्या अग्निशमन सेवा सक्षमीकरणासाठी व बळकटीकरणासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. राज्यात राज्यस्तरीय अग्निशमन सेवा नसल्यामुळे ही सेवा नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरणे यांच्यामार्फत पुरविण्यात येते. सद्य:स्थितीत राज्यातील १३८ तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी नगरपालिका/नगरपंचायती स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे. याबाबत कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर सध्याची योजना या तालुक्यांना लागु करण्याचा विचार करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य शासनाने राज्यातील विकास कामांसाठी ८०० कोटी रुपयांचे कर्ज रोखे काढण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(३९) * ५८५६ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने राज्यातील विकास कामांसाठी ८०० कोटी रुपयांचे कर्ज रोखे काढण्याचा निर्णय दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कर्जरोख्याचे स्वरुप काय आहे व या कर्ज रोख्याची बाजारातील पत काय आहे,
(३) असल्यास, सदरहू कर्ज रोखे उभारण्याची कारणे काय आहेत व यामुळे राज्याच्या तिजोरीवर दर वर्षाला किती रुपयांचा बोजा पडणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.
(२) सदरचे कर्जरोखे राज्यातील विविध विकास कामांसाठी घेण्यात आले असून हे कर्ज १० वर्षासाठी उभारले आहे. रिझर्व्ह बँकेमार्फत घेण्यात येणा-या लिलावामधून सदरचे कर्जरोखे उभारण्यात आले असून या लिलावामध्ये बँका, वित्तीय संस्था सहभागी होतात.
(३) सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पामध्ये रु. २५०८३.३० कोटी इतके खुल्या बाजारातून कर्ज उभारणे प्रस्तावित असून या वित्तीय मर्यादेतच सदर कर्ज उभारण्यात आले आहे. सदरहू कर्जाचा निधी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा होत असून आवश्यकतेनुसार याचा विनियोग राज्यातील विविध विकासकामांसाठी करण्यात येणार आहे. या रु.८०० कोटी कर्जाचा व्याज दर ८.०५ % असून यानुषंगाने वार्षिक रु.६४.४० कोटीचा बोजा पडणार आहे.

-----------------

**मौजे लाडघर (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील रस्त्याचे कामाबाबत**

**(४०) * ५८८६ श्री.विजय सावंत :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लाडघर (खालचा मोहल्ला-भंडारवाडा) (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील लाडघर मराठी शाळा नंबर १ ते चंडीका देवी मंदिर येथे खालचा मोहल्ला (भंडारवाडा) मधून समुद्र किनारी जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण, खडीकरण, डांबरीकरण करुन रस्त्याच्या बाजूस गटार काढून रस्त्या अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील प्रकरणी मागील ३ वर्षापासून सातत्याने मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.ग्रामविकास, मंत्री, मा.पालकमंत्री रत्नागिरी जिल्हा, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, रत्नागिरी जिल्हा परिषद, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, संगमेश्वर आदीकडे लेखी निवेदनाद्वारे स्थानिक ग्रामस्थांनी मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) अद्यापी निर्णय घेतला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) सदरहू रस्त्याचे काम पूर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) जिल्हा परिषदकडे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३), (४), (५) व (६) प्रश्नांकित खालचा मोहल्ला (भंडारवाडा) मधून समुद्र किनारी जाणारा असा रस्ता अस्तित्वात नाही. नवीन रस्ता तयार करण्यासाठी या विभागाकडे लेखाशिर्ष व निधी उपलब्ध नाही.

-----------------

## राज्यात वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रिया यांचे दरनियंत्रण पारदर्शकपणे ठरविण्याबाबत

**(४१) * ५९३२ श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिवसेंदिवस महागड्या होत जाणा-या वैद्यकीय सेवेवर आता एकच दरनियंत्रण पारदर्शकपणे ठरविण्याबाबत शासन विचाराधीन असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय दरनियंत्रण समितीचे सदस्य आणि छोटे रुग्णालय चालविण्याचा अनुभव असलेल्या डॉ.गद्रे यांनी दरनियंत्रणाची एक पध्दत विकसित केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, विमा कंपन्या आणि रुग्णालये यांनी उपचार आणि शस्त्रक्रियांचे दर कसे ठरवावेत, याबाबत पुणे येथे नव्या पेठेतील पत्रकार भवनमध्ये जनआरोग्य अभियान चर्चा आयोजित केली होती, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपचारांचे दरनियंत्रण पारदर्शी ठेवण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

क्लीनिक एस्टॅब्लीशमेंट ॲक्ट लागू करण्यासंदर्भात कार्यवाही चालू आहे.

(२) उपरोक्त कायदा लागू करण्यासंदर्भात स्थापन केलेल्या केंद्रिय दर नियंत्रण समितीचे सदस्य डॉ. गद्रे यांचेकडून दरनियंत्रणाची पध्दत विकसित करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(३) हे खरे आहे.

(४) दर नियंत्रणाची पध्दत विकसित करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जरंडी (ता.सोयगांव, जि.औरंगाबाद) येथील ३० वर्षापूर्वीच्या शाळेची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४२) * ५९५८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जरंडी (ता.सोयगांव, जि.औरंगाबाद) येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची इमारत ३५ वर्षापूर्वीची असून पावसामुळे सदरहू शाळेचा पाया ढासळल्याने विद्यार्थ्यांचे जीवन धोक्यात आले असुन संबंधित जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने आवश्यक ती कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

मौजे जरंडी परिसरात डिसेंबर, २०१४ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे प्राथमिक शाळेच्या इमारतीपैकी एका शाळा खोलीच्या मागील भिंतीचा पाया अंशतः ढासळला होता.

तथापि, विद्यार्थ्यांसाठी पुरेशा वर्गखोल्या उपलब्ध असल्यामुळे सदर खोलीचा वापर शालेय निरुपयोगी साहित्य ठेवण्यासाठी केला जात असल्याने विद्यार्थ्यांचे जीवन धोक्यात आलेले नव्हते.

(२) गट शिक्षणधिकारी, पंचायत समिती, सोयगाव यांनी आवश्यक पाहणी करुन ढासळलेल्या भागाची तातडीने दुरुस्ती करुन घेतली आहे व सदर इमारत तत्काळ सुस्थितीत आणण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रोजगार हमी योजना अंतर्गतच्या जवाहरधडक सिंचन विहीर कार्यक्रमाबाबत**

**(४३) * ४०३९ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नियोजन विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक विहीर २०१४/प्र.क्र.६/रोहयो-५ दिनांक २२ डिसेंबर, २०१४ अन्वये रोजगार हमी योजना अंतर्गतच्या जवाहर/धडक सिंचन विहीर कार्यक्रमा अंतर्गत अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती आणि लहान व सिमांत शेतकरी प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या प्रगती पथावरील विहीर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजना महाराष्ट्र योजनेंतर्गत वर्ग करण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०१५ ही कटऑफ तारीख दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजना महाराष्ट्र योजना अंतर्गत वर्ग करुन प्रशासकीय मान्यता दिलेला दिनांक अथवा दिनांक ३१ मार्च, २०१५ पैकी जो अगोदरचा दिनांक असेल त्या दिनांकापर्यत विहीरीच्या कामाचे मुल्यांकन करण्यात यावे व देय अनुदान जवाहर/धडक सिंचन विहीर योजनेतून देण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील शासन निर्णयानुसार इतर लाभार्थ्यांच्या विहीरी पूर्ण करण्यासाठी देय अनुदानात वाढ करण्यात येऊन सदर अनुदान रुपये २.५० लक्ष इतक्या मर्यादेत करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती आणि लहान व सिमांत शेतकरी प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या प्रगती पथावर सुरु असलेल्या विहीरी पूर्ण करण्यासाठी सुध्दा देय अनुदान रुपये २.५० लक्ष देणार आहात काय,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) होय.

(४) अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती आणि लहान सिमांत शेतकरी प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या अपूर्ण विहिरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वर्ग करुन पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मग्रारोहयो अंतर्गत सिंचन विहिरीसाठी रु.३.०० लक्ष पर्यंत खर्चाची रक्कम देय आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी राज्यातील महानगरपालिका हद्दीतील शहरात हत्तींच्या संचारावरील आदेश डावल्याबाबत

**(४४) * ३०२९ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी राज्यातील महानगरपालिका हद्दीतील हत्तींच्या संचारावरील बंदीवरील आदेशाला डावल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशान्वये हत्ती बाळगणाऱ्यांकडे त्यांच्या स्वामित्वाचे प्रमाणपत्र आणि त्यांच्या देखभालीची सुरक्षेची हमी मालकाकडे असणे तसेच परराज्यातून हत्ती राज्यात आणावयाचा झाल्यास राज्याचे मुख्य वन्यजीव रक्षक यांचे ना हरकत प्रमाणपत्र गरजेचे आहे असे असुनही नागपुर येथील वनधिकाऱ्यांनी शहरात हत्ती आणण्यास परवानगी दिल्यामुळे वरील आदेशाची पायमल्ली नागपुर या वनविभागाच्या मुख्यालयी झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही.

संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांचे पूर्व परवानगीशिवाय महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये हत्तींची संचार होणार नाही असे दिनांक ०८.१२.२०१४ च्या पत्रान्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तथा मुख्य वन्यजीव रक्षक महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी आदेश पारीत केलेले आहेत.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तथा मुख्य वन्यजीव रक्षक यांनी वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ४०(२) चे अधिकार मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांना प्रत्यार्पित (Delegate) करण्यात आलेले आहेत. उपरोक्त आदेश व अधिकारांचा वापर करुन मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांनी नागपूर महानगर पालिकेच्या हद्दीमध्ये केंद्र शासनाच्या हत्ती प्रकल्पाच्या तरतूदीच्या व विविध अटी व शर्तीच्या अधीन राहून धार्मिक कारणाकरिता हत्ती आणण्यास दि.२६.१२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये परवानगी दिलेली आहे.

(३) श्री.इदरीस अहमद बल्द बद्रुद्दीन खान, रा.घुसीयारी, ता.मोहदहा, जि.हमीरपूर (उत्तर प्रदेश) यांनी हत्तीची वाहतूक आवश्यक परवान्याशिवाय (Valid Transit Permit) केल्यामुळे वन्यजीव (संरक्षण), अधिनियम, १९७२ चे कलम ४८(३) अन्वये दिनांक ०५.०१.२०१५ रोजी वनगुन्हा नोंदविण्यात आला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गेवराई येथील उपजिल्हा रुग्ण्यालयात अत्याधुनिक सुविधा पुरविणे व वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४५) * ३६६७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे ट्रॉमा केअर युनिट, रक्तसाठा विभाग, दंत विभाग, ई.सी.जी. युनिटसह अनेक विभाग बंद असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय अधिकाऱ्यांसह इतर रिक्त पदे भरुन रुग्णालयातील सर्व विभाग तातडीने सुरु करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रुग्णालयातील बंद असलेले विभाग व अत्याधुनिक रुग्णसुविधा, यंत्रणा सुरु करुन रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशतः खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय, गेवराई, जि.बीड येथील रक्तसाठवण केंद्र २४ तास सतत विज उपलब्धतेअभावी बंद होते तसेच दंत विभाग व ईसीजी विभाग तज्ञ अधिकाऱ्यांअभावी बंद आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

दिनांक १९.०१.२०१५ रोजी लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने आरोग्य सेवा संचालनालयाच्या स्तरावरुन जिल्हा शल्य चिकित्सक, बीड यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) या रुग्णालयातील रक्त साठवण केंद्रास सतत २४ तास विज उपलब्ध न झाल्यामुळे सदर युनिट बंद होते तथापि आता याकरिता जनरेटरची व्यवस्था करण्यात आली आहे. ईसीजी विभागाकरिता आवश्यक अर्हता प्राप्त उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे एम.बी.बी.एस. अर्हताधारक उमेदवार भरण्यात आला आहे. येथील वैद्यकीय अधिक्षक, वर्ग-१ व दंत विभागातील आवश्यक अधिका-यांचे पद नामनिर्देशनाने भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. सद्यःस्थितीत वैद्यकीय अधिकारी गट-अ च्या ७ मंजूर पदांपैकी ७ पदे कार्यरत आहेत. तसेच गट-क ची रिक्त पदे भरण्याबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा लातूर व गट-ड ची रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, बीड यांच्या स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यातील चांदवड, बागलाण, मालगाव, निफाड व सिन्नर तालुक्यातील पल्स पोलिओच्या कामाबाबत**

**(४६) * ५१९४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील चांदवड, बागलाण, मालगाव, निफाड व सिन्नर तालुक्यातील पल्स पोलिओचे काम शासनाने दिलेल्या १०० टक्क्यांचे उद्दीष्ट पूर्ण न करता केवळ ६८ टक्के इतकेच सरासरी पेक्षा कमी झाल्याने तेथील ४० तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांना नोटीसा बजावून खुलासा मागितल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

(२) कमी काम झालेल्या वैद्यकिय अधिका-यांना दि.२० ते २२ जानेवारी, २०१५ दरम्यान घरोघर भेटी देवून लसीकरणापासून वंचित राहिलेल्या सर्व बालकांना डोस देण्याबाबतच्या सुचना देण्यात आल्या होत्या व त्यानुसार नाशिक जिल्ह्याचे पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचे काम ९९.०५ टक्के एवढे झालेले आहे.

(३) निरंक

-----------------

**डिस्ट्रीक्ट फॉरेन्सीक एक्सपर्ट हे पद प्रत्येक जिल्हा रुग्णालयात काढण्याच्यर प्रस्तावाबाबत**

**(४७) * २७०० श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिस्ट्रीक्ट फॉरेन्सीक एक्सपर्ट हे पद प्रत्येक जिल्हा रुग्णालयात काढण्याचे प्रस्तावित आहे काय,

(२) असल्यास, त्याबद्दल शासन स्तरावर काय कार्यवाही सुरु आहे याची माहिती द्यावी,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय,

(४) असल्यास, किती दिवसात कार्यवाही करण्यात येईल ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

(२) राज्यात २३ जिल्हा रुग्णालये ४ सामान्य रुग्णालये या ठिकाणी न्यायवैद्यकीय केसेस हाताळण्यासाठी न्यायवैदयकीय तज्ञ गट-अ (वर्ग-१) आणि अपघात वैदयकीय अधिकारी, गट-अ (वर्ग-२) ही पदे निर्माण करणेबाबत तसेच सुधारीत तज्ञ व तंत्रज्ञ यांचे पद निर्माण करणेबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मौजे मोरी (ता.वसई, जि.पालघर) येथे वनपरीक्षेत्र जमिनीवर परप्रांतीय भूमाफिया बेकायदेशीर औद्योगिक गाळे निर्माण करीत असल्याबाबत**

**(४८) * ४६४४ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मोरी (ता.वसई, जि.पालघर) येथील सर्वे नं.३५, हिस्सा नं.२ या राखीव वनपरिक्षेत्र जमीनीवर परप्रांतीय भूमाफिया बेकायदेशीर औद्योगिक गाळे निर्माण करीत असल्याची बाब दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने उक्त ठिकाणी बेकायदेशीर औद्योगिक गाळे निर्माण करीत असलेल्या भूमाफियांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, कारवाईस होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे.

सदर अतिक्रमण निष्कासित करण्यात आले आहे. तसेच सदर प्रकरणी श्री.अमितकुमार सिंग यांचेविरुध्द दिनांक १९.०२.२०१५ रोजी वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्या अनुषंगाने आरोपीस अटक करुन मा.न्यायलयासमोर हजर करुन कठोर कारवाई करण्याबाबत पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्ह्यातील कोयना अभयारण्य आणि चांदोली राष्ट्रीय उद्यानांमधील जंगलामध्ये वन्य प्राण्यांच्या ये-जा व्हावी यासाठी राखून ठेवलेल्या भ्रमनमार्गावरील वृक्षतोडीबाबत**

**(४९) * ३६८० अॅड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील कोयना अभयारण्य आणि चांदोली राष्ट्रीय उद्यानांमधील जंगलामध्ये वन्य प्राण्यांना ये-जा करण्यासाठी राखून ठेवलेल्या भ्रमणमार्गावर पुण्यातील उद्योगपती श्री.हुंबरे यांनी मोठया प्रमाणात वृक्षतोड केल्याचे तसेच या वृक्षतोडीकडे वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडून पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाची चौकी आणि पोलीस पहारा जवळ असतानाही वृक्षतोड होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोयना आणि चांदोली ही दोन्ही महत्वाची वनक्षेत्रे सहयाद्री वाघ्र प्रकल्पाअंतर्गत येत असून या दोन्ही वनक्षेत्रामधील ५ किलोमीटरचा पट्टा राखून ठेवण्यात आला असून या पट्टयातील प्रचंड प्रमाणावर झालेल्या वृक्षतोडीबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वृक्षतोड करणाऱ्यांवर व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील कोयना अभयारण्याबाहेरील मौजे केमसे या गावातील मालकी गट नं. ४/१ व ३५/४ मधील दोन प्रकरणात सुमारे २ ते २.५ हेक्टर मालकी क्षेत्रावरील ६७६ झाडांची तोड झाली आहे.

सदर वृक्षतोडीबाबत वन विभागाकडून संबंधितांवर गुन्हा नोंदवण्यात येऊन दंडनीय कारवाई करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) सदर दोन प्रकरणांमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

महाराष्ट्र (वृक्षतोड) अधिनियम, १९६४ व सुधारीत १९८९ कलम ३ व ४ नुसार वनक्षेत्रपाल पाटण यांनी मौजे केमसे मालकी गट नं. ४/१ व ३५/४ मधील अनुसूचित वृक्ष प्रजातीची ३३२ झाडे तोडल्याबाबत श्री.दत्तात्रय बबन उंद्रे रा.मांजरी खुर्द, ता.हवेली, जि.पुणे व इतर २ यांना एकूण रु. १,१५,२००/- रुपये दंड करुन ६३.०० घ.मी. जळावु किटा सरकार जमा करण्यात आला आहे.

तसेच उप विभागीय अधिकारी, पाटण यांनी केमसे गट नं. ४/१, ३५/४ मधील बिगर अनुसूचितील वृक्ष प्रजातींची एकूण ३४४ झाडे विनापरवानगी तोडल्याबद्दल श्री.दत्तात्रय बबन उंद्रे, रा.मांजरी खुर्द, ता.हवेली व इतर २ व्यक्तींना रु.५९,०२४/- इतका दंड करुन तहसिलदार पाटण यांचेकडे शासकीय खजिन्यात जमा करण्याचे आदेश दिले आहेत.

-----------------

**वैजापूर (जि.औरंगाबाद) येथील रामकृष्ण उपसा जलसिंचन योजना शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत**

**(५०) * ३९४१ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.संदिप बाजोरिया, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) येथील रामकृष्ण उपसा जलसिंचन योजना शासनाच्या ताब्यात घेऊन शेतकऱ्यांचा ७/१२ वरील कर्जाचा बोजा कमी करण्याचा निर्णय घेणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना वेतन, प्रवास व दैनिक भत्ता अदा करण्याबाबत**

**(५१) * ५२४५ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना ३ महिन्याचे वेतनासह माहे मार्च, २०१४ पासूनचे प्रवास व दैनिक भत्ते मिळालेले नसल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेतन व भत्ते न मिळाल्याने दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास पासून वरिष्ठ पातळीवर क्षयरोगाचा कोणताही अहवाल न पाठविण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कर्मचारी संघटनेने घेतला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमात गेल्या चौदा वर्षांपासून अत्यंत अल्प मानधनावर कार्यरत कर्मचाऱ्यांना त्यांचे थकीत वेतन व प्रवास तसेच दैनिक भत्ते तात्काळ अदा करणेबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, राज्यात क्षयरोगाचा वाढत असलेला प्रादुर्भाव विचारात घेता क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) राज्यातील सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातील कंत्राटी कर्मचा-यांचे माहे डिसेंबर, २०१४ पर्यंतचे वेतन तसेच प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अदा करण्यासाठी आवश्यक असलेला निधी जिल्ह्यांना उपलब्ध केलेला आहे. उर्वरित ३ महिन्यांचे अनुदान उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) होय.

(३) सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यासाठी लागणारा निधी केंद्र शासनाकडून प्राप्त होतो. त्यानुसार केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला पहिला हप्ता रु. १८.४३ कोटी इतका निधी राज्य आरोग्य सोसायटी, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांना वितरित करण्यात आला आहे. तसेच केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला दुसरा हप्ता रु. ३२.०० कोटी इतका निधी राज्य शासनाकडे पाठविला आहे. सदरचा निधी राज्य आरोग्य सोसायटी, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचेकडे वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) राज्यात सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी ४१६ क्षयरोग उपचार पथके व १४५९ सूक्ष्मदर्शी केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. क्षयरुग्णांना मोफत डॉट्स उपचार देण्यासाठी ३८, ५१७ डॉट प्रोव्हायडर्स कार्यरत आहेत. या कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने करार तत्त्वावर २०५८ कर्मचारी मंजूर केलेले आहेत. चालू वर्षी हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी केंद्र शासनाने रु. ७५.५६ कोटी निधी मंजूर केलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संगमेश्वर (जि.रत्नागिरी) पंचायत समितीमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(५२) * ३८६४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) पंचायत समितीमध्ये शेतकऱ्यांना सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात ५० टक्के अनुदान व ५० टक्के शेतकऱ्यांचा सहभाग या योजनेतून साहित्याचे वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनुदान वाटपातून शेतकऱ्यांचा सहभाग असलेली ५० टक्के रक्कम ही कृषी अधिकाऱ्यांनी पंचायत समितीमध्ये जमा न करता स्वत:चे ताब्यात बेकायदेशीररित्या ठेवली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी संबंधित कृषी अधिकारी यांचे विरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

तथापि, श्री.कणसे कृषी अधिकारी यांनी स्वतःकडे ठेवून घेतलेली रक्कम रु.१८,३६,५९८/- दि. ९/१०/२०१४ रोजी भरणा केलेली आहे.

(३) व (४) संबंधित कृषी अधिकारी श्री.आर.व्ही. कणसे यांना सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्यांची खातेनिहाय चौकशी करण्यात येत आहे.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यातील निलंबित ग्रामसेवकांवर होणारा अतिरिक्त खर्च टाळण्याबाबत करावयाची उपाययोजना**

**(५३) * ३४३७ श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात मागील सात वर्षात निलंबित ग्रामसेवकांवर वर्षाकाठी सुमारे ७५ लाख रुपये खर्च होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निलंबित ग्रामसेवकांची सखोल चौकशी करुन तसेच पैसे खर्च होऊ नयेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) शासनाच्या विविध योजनांच्या ग्रामीण स्तरावरील अंमलबजावणीचे महत्वपूर्ण कामकाज ग्रामसेवक या कर्मचा-यांकडून होत असते. अशा योजनांच्या अंमलबजावणीतील अनियमिततांमुळे जबाबदार ग्रामसेवकावर कारवाई करणे आवश्यक असते. त्यानुसार सद्यस्थितीत यवतमाळ जिल्हापरिषदेतंर्गत २९ ग्रामसेवक निलंबित आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (निलंबन कालावधीतील प्रदाने) नियम १९८१ मधील तरतूदीनुसार अशा निलंबित शासकीय कर्मचा-यांना निर्वाह भत्ता मंजूर करण्यात येतो. सद्यस्थितीत निलंबित ग्रामसेवकांची संख्या विचारात घेता वर्षाकाठी निलंबन भत्त्यापोटी अंदाजित ५२ लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे.

निलंबित कर्मचा-यावरील निलंबनाबाबतचा आढावा घेण्याच्या दृष्टीकोनातून क्षेत्रीय स्तरावरील वर्ग-३ व ४ च्या कर्मचा-यांसाठी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केलेली आहे. अशा निलंबन कारवाईबाबत प्रकरणपरत्वे निर्णय घेण्याचे अधिकार विभागीय आयुक्त किंवा प्रशासकीय प्रमुख म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. निलंबित कर्मचा-यांच्या निलंबनाचा नियमित आढावा घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मोरगाव (ता.बारामती, जि.पुणे) येथील अष्टविनायक तीर्थक्षेत्रास शासनाने निधी उपलब्ध करून देणेबाबत**

**(५४) * ४७२९ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोरगाव (ता.बारामती, जि.पुणे) हे अष्टविनायकापैकी एक तिर्थक्षेत्र असल्याने शासनाने या तिर्थक्षेत्रास 'ब' वर्ग तिर्थक्षेत्र म्हणून माहे ऑगस्ट २०१४ मध्ये वा त्या दरम्यान घोषित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तिर्थक्षेत्रास 'ब' वर्ग तिर्थक्षेत्र घोषित करुनही अद्याप त्यास शासनाने निधी उपलब्ध करुन दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तिर्थक्षेत्रास त्वरीत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

राज्य निकष समितीच्या दिनांक ५ जुलै, २०१४ रोजी झालेल्या बैठकीत श्री.मोरगांव, ता.बारामती, जि.पुणे या तीर्थक्षेत्रास "ब" वर्ग दर्जा देण्यात आला आहे,

(२), (३) व (४) तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी करावयाची प्रस्तावित कामे शासन निर्णय दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ मधील निकषानुसार नसल्याने, सदरहू निकषानुसार प्रस्तुत तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी करावयाच्या कामांची, चालू दरसुचीवर आधारीत, सक्षम प्राधिका-यांच्या तांत्रिक मान्यतेची सविस्तर अंदाजपत्रके (रु. २.०० कोटीच्या मर्यादेत) जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडून मागविण्यात आली आहेत. सदर अंदाजपत्रके प्राप्त झाल्यावर, प्रस्तुत तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी करावयाच्या कामांना निधी देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य निकष समितीच्या बैठकीत सादर करण्यात येईल.

-----------------

**संजय गांधी राष्ट्रीय उद्यान अंतर्गत वन जमिनींवर अनधिकृत बांधकाम सुरु असल्याबाबत**

**(५५) * ५२३३ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानांतर्गत वन जमिनीवर गोखिवरे, मोजे मोरी, तुंगारेश्वर येथे अनधिकृत औद्योगिक गाळे तसेच वसई तालुक्यात अनधिकृत खदानी असल्याची माहिती माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनपरिक्षेत्र अधिकारी गोखिवरे अंतर्गत मुंबई-अहमदाबाद महामार्गावर वन विभागाच्या जमिनीवर अतिक्रमणे वन विभागाच्या अधिकाऱ्याच्या संगनमताने झालेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) मौजे मोर, ता. वसई येथे तुंगारेश्वर अभयारण्याच्या कार्यक्षेत्रात बेकायदेशीर औद्योगिक गाळयांचे बांधकाम सुरु आहे, तसेच औद्दयोगिक गाळयांसाठी राखीव वन जमिनीतून बेकायदेशीर रस्ता तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मौजे चंद्रपाडा, ता.वसई येथे वनपरिक्षेत्र अधिकाऱ्या संगनमताने बेकायदा इमारतीचे बांधकाम सुरू आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

तुंगारेश्वर अभयारण्याच्या अधिसूचित क्षेत्राव्यतिरीक्त मौजे मोरी खाजगी संपादित वने सर्वे क्रमांक ३५ मध्ये काही अनधिकृत औद्योगिक गाळ्यांचे बांधकाम सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच वसई तालुक्यातील मौजे राजावली संरक्षित वन सर्वे क्र.३४६ मध्ये ६ खाणीना सन २००५ ते २०२५ पर्यंत केंद्र शासन व राज्यशासनाची अधिकृत परवानगी देण्यात आलेली आहे.

(२) मुंबई-अहमदाबाद महामार्गावर तुंगारेश्वर अभयारण्याच्या अधिसूचित क्षेत्राव्यतिरिक्त संरक्षित वनजमिनीवर काही ठिकाणी अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि सदरची अतिक्रमणे वन विभागाच्या संगनमताने झालेली नाहीत.

(३) मौजे मोरी खाजगी संपादित वने सर्वे क्रमांक ३५ मध्ये काही अनधिकृत औद्योगिक गाळ्यांचे बांधकाम सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि सदर गाळ्यांसाठी वनजमिनीतून बेकायदेशीर रस्ता तयार केल्याची बाब खरी नाही.

(४) व (५) तुंगारेश्वर अभयारण्याच्या अधिसूचित क्षेत्राव्यतिरीक्त वनविभागाच्या ताब्यातील मौजे चंद्रपाडा संरक्षित वन सर्वे नं.५५६ (नवीन २०६) मध्ये असलेल्या काही जुन्या इमारतींचे बेकायदेशीररित्या दुरूस्तीचे काम सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. ते तात्काळ थांबविण्यात आले असून अशा प्रकारच्या १२ अतिक्रमकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरच्या अतिक्रमकांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ५३, ५४ अन्वये अतिक्रमण हटविणेबाबत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. संबंधितांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देऊन तात्काळ अतिक्रमण हटविण्यात येणार आहे. या व्यतिरीक्त याच ठिकाणी जुने अस्तित्वात असलेले अतिक्रमण पंरतु नव्याने कोणतीही दुरुस्ती न केलेल्या २५० अतिक्रमकांविरुद्ध ऑक्टोबर, २०१४ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपासाची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अकोला जिल्ह्यातील ग्रामीण भागातील बहुतांश रस्ते नादुरुस्त असून**
**सदर रस्त्याचे डांबरीकरण व मजबुतीकरण करणेबाबत**

**(५६) * २९१७ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ४८९३९ ला दिनांक ६ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील ग्रामीण भागातील बहुतांश रस्ते नादुरुस्त असून सदर रस्त्याचे डांबरीकरण व मजबुतीकरण करुन ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता जिल्हा वार्षिक योजनेमध्ये तुटपुंजा निधी तरतूद करण्यात येत असल्यामुळे केवळ १० टक्के रस्त्याचीच दुरुस्ती करणे शक्य होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांच्या डांबरीकरण व मजबुतीकरणांकरिता येत्या अर्थसंकल्पात जादा तरतुद करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, उक्त ग्रामीण रस्त्यांकरिता सर्वसाधारण किती तरतुद करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३) व (४) अंशतः खरे आहे.

रस्ते विकास आराखडा २००१-२०२१ नुसार जिल्हा परिषद अकोला अंतर्गत इजिमा व ग्रामीण मार्गाची अस्तित्वातील एकूण लांबी १८६१.२६ कि.मी. आहे.

जिल्हा परिषद अकोलाकरिता जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन २०१२-१३ ते २०१४-१५ मध्ये रु. २७६०.८४ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

तसेच रस्ते व पुल दुरुस्ती व परिरक्षण कार्यक्रमांतर्गत अकोला जिल्हा परिषदेकरिता सन २०१२-१३ ते २०१४-१५ मध्ये १८२८.६५ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्रत्येक जिल्हयात महिला व बालरुग्णालय निर्माण करण्याबाबत**

**(५७) * ४००२ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरक्षित प्रसूती व प्रसूतीनंतर उत्तम आरोग्य सेवा देण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्यात महिला व बाल रुग्णालय व्हावे त्यानुषंगाने तत्कालीन राज्य सरकारने दोन वर्षापूर्वी भंडारा जिल्ह्यात १०० खाटांच्या महिला रुग्णालयाला मान्यता दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालय पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

(२) या रुग्णालयाकरीता आवश्यक जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे शहरासाठी पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणेबाबत**

**(५८) * ३२८९ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्याच्या खडकवासला धरणात यावर्षी तुलनेत कमी पाणीसाठा झालेला आहे, जलसंपदा विभाग व महानगरपालिका यांच्यातही पुण्याला नेमके किती पाणी देण्यात येते याबाबत संभ्रम आहे, पुण्यासाठी पाण्याचे नियोजन करण्यासाठी धरणांतील गळती दुरुस्ती, गाळ काढणे, पाईपलाईन दुरुस्ती, रेन वॉटर हारवेस्टींग, जमिनीत पाणी जिरवून कुपनलिकासाठी भुगर्भजलाची पातळी उंचावणे अशा विविध उपायांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात शासकीय यंत्रणा कमी पडत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासन याबाबतीत काही धोरणात्मक कार्यप्रणालीची अंमलबजावणी करणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,

(४) सदर तपशिल उपलब्ध नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

खडकवासला संयुक्त प्रकल्पाच्या चार धरणांचा प्रकल्पीय उपयुक्त साठा २९.१५ अब्ज घनफूट इतका असून सन २०१४ च्या पावसाळ्याअखेरीस या चार धरणांमध्ये उपयुक्त साठा २८.४५ अब्ज घनफूट म्हणजेच ९७.६० टक्के इतका झाला होता.

पुणे शहराकरिता जलसंपदा विभागाने खडकवासला संयुक्त प्रकल्प तसेच पवना व भामा आसखेड या प्रकल्पातून एकूण १४.६०८ अब्ज घनफूट इतका पाणी कोटा मंजूर केला असून पुणे महानगरपालिका व जलसंपदा विभाग यांच्यात झालेल्या करारानुसार सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ६.५० अब्ज घनफूट पाणी सिंचनासाठी खडकवासला जुन्या कालव्यामध्ये उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. सन २००५-०६ ते सन २०१३-१४ या दरम्यानचा पुणे महानगरपालिकेचा पाणी वापर ११.१६ ते १६.३४ अब्ज घनफुट इतका झालेला आहे.

पुणे महानगरपालिकेमार्फत पाईपलाईन दुरूस्ती, रेनवॉटर हारवेस्टींग इ.कामे हाती घेण्यात आली आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात वाघ व इतर प्राण्यांची शिकार करणाऱ्या टोळीवर कारवाई करण्याबाबत**

**(५९) * ४१९७ श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१० च्या व्याघ्रगणनेच्या तुलनेत २०१४ च्या व्याघ्रगणनेत केवळ साडेबारा टक्के वाघ राज्यात वाढले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात विशेषतः विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, अमरावती, यवतमाळ जिल्ह्यात वाघ व वन्य प्राण्यांची शिकार करुन त्यांचे अवयवाची विक्री करणारी टोळी विदर्भात मोठया प्रमाणात आढळून आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील सहा व्याघ्र प्रकल्पात वाघांची शिकार करण्यासाठी मध्यप्रदेशातील बहेलिया टोळी सक्रिय झाल्याची माहिती माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, मेळघाट, पेंच व्याघ्र प्रकल्पांसह उमरेडक-हांडला, बोर या अभयारण्यांना शिका-यांनी लक्ष्य केले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) वाघांच्या संख्येत वाढ होण्यासाठी व वाघांच्या शिकारीला आळा बसण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) व (७) वाघांच्या संख्येत वाढ होण्यासाठी व वाघांच्या शिकारीला आळा बसण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- सर्व व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात वायरलेस यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे.
- जंगलात आवश्यक ठिकाणी संरक्षण व निरीक्षण मनोरे उभारलेले असून, वनकर्मचारी त्यात वास्तव्यास असतात.
- पेंच व ताडोबा व्याघ्र प्रकल्पात विशेष व्याघ्र संरक्षण दल Special Tiger Protection Force (STPE) तैनात केली आहे.
- संरक्षित क्षेत्रात नियमितपणे पायी, वाहनाद्‌वारे व पावसाळ्यात आवश्यक त्या ठिकाणी माजी सैनिकाद्‌वारे गस्त करुन शिकारीवर नियंत्रण ठेवण्यात येत आहे.
- कर्मचा-यांना पिस्तुल, रायफलसारख्या अत्याधुनिक शस्त्रांचा पुरवठा केलेला आहे.
- तसेच एखाद्‌या घटनेचा जलद गतीने पाठपूरावा करण्यासाठी वाहनाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

- संरक्षित क्षेत्रात असणा-या संवेदनशील वनक्षेत्रास वारंवार भेटी देण्यांत येत आहेत.
- प्रकल्प क्षेत्रात तपासणी नाके असून त्याद्वारे वाहनांची नियमित तपासणी करण्यात येत आहे.
- खब-याला बक्षिस देण्यासाठी गुप्त सेवा निधीची तरतूद केलेली आहे.
- व्याघ्र प्रकल्पाच्या नजीकच्या क्षेत्रालगत बाहेरील काही अनोळखी व्यक्ती इत्यादी आले किंवा कसे याची शहानिशा करण्याकरीता सुरक्षित क्षेत्रालगतचे गावांमध्ये नियमित भेटी देऊन पोलीस पाटील/सरपंच इत्यादींची भेट घेऊन माहिती प्राप्त करण्यात येते. तसेच आठवडी बाजारात नियमीतपणे गस्त केली जात आहे.
- चंद्रपूर व नागपूर येथे Sniffer Dog ठेवण्यांत आले असून, त्यांचेद्वारे नियमितपणे रेल्वे स्टेशन, बस स्टॅण्ड, आठवडी बाजार व संशयास्पद ठिकाणी वन्यप्राण्यांचे अवयव या बाबींचा शोध घेतला जातो.
- तसेच वन्यजीव अधिवास विकासाची कामे हाती घेतली जातात.

वन्यप्राणी विशेषतः वाघाचे हालचालींचा मागोवा घेण्याकरीता त्याचे जाणे-येण्याचे संभावीत रस्त्यावर, पाणस्थळाजवळ नियमितपणे कॅमेराट्रॅप लावण्यात आले आहे.

-----------------

**चंद्रपूर जिल्हयात सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारीतोषीक योजना यशस्वीपणे राबविण्याबाबत**

**(६०) * २९५१ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दोन मुलीवर (अपत्यावर) शस्त्रक्रिया करणाऱ्या दारिद्रयरेषेखालील कुटुंबासाठी सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारीतोषीक योजना राबवित असताना चंद्रपूर जिल्हयातील सन २०१४-१५ या वर्षात नोव्हेंबर पर्यंत एकाही लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४-१५ या वर्षात ३८५ प्रकरण प्राप्त होवूनही ६५ प्रकरणे नामंजूर तर ३२० प्रकरण मंजूरीच्या प्रतिक्षा यादीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रतिक्षा यादीत पात्र धारकांना शासन लाभ मिळवून देणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) एकुण ३८५ प्रकरणांपैकी उपात्र ६५ प्रकरणे नामंजुर करण्यात आली आहेत. उर्वरित ३२० प्रकरणापैकी २१७ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. आणि १०३ प्रकरणाबाबत प्रशासकिय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) होय.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यासाठी राबविण्यात येणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेसाठी निधी देण्याबाबत

**(६१) * ३०८६ ॲड.अनिल परब, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यासाठी राबविण्यात येणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेसाठी एक हजार कोटी रूपयांची तरतूद करून त्यातील ६०० कोटी रुपये माहे जून, २०१५ पर्यंत उपलब्ध करून देण्याच्या निर्णय दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जलयुक्त शिवार अभियानाच्या आढावा बैठकीत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उपक्रमांतर्गत किती गावे वर्षभरात टंचाईमुक्त करण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, या योजनेची अंमलबजावणी राज्यात करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) वर्षभरात ५००० गावे टंचाईमुक्त करण्यात येणार आहेत.

(३) सन २०१५-१६ मध्ये जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत एकुण ५ हजार गावे टंचाई मुक्त करण्याचे नियोजन असुन, या कालावधीत सुमारे १० हजार साखळी सिमेंट नाला बंधारे व इतर संलग्न जलसंधारणाची कामे यासाठी रु.१००० कोटी तसेच सुमारे ४४,००० विहीरी पुढील २ वर्षात खोदण्याचे नियोजन आहे. फेब्रुवारी २०१५ अखेर २७४१ गावांमध्ये ६१२४ कामे सुरू आहेत.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत महात्मा फुले जल भूमी संधारण अभियानमधुन रुपये ७५ कोटी वितरित केला असुन सन २०१५-१६ साखळी सिमेंट नाला बांध आणि इतर संलग्न कामांकरिता रु.१००० कोटी जिल्हा नियोजन विकास समिती मार्फत उपलब्ध करुन देण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पंतप्रधान ग्रामसडक योजनेची कामे अपूर्ण असल्याबाबत

**(६२) * ३९०३ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पंतप्रधान ग्रामसडक योजनेची १,२८८ कामे माहे डिसेंबर, २०१४ अखेर अपूर्ण आहेत तसेच नोव्हेंबर, २०१० ते सप्टेंबर, २०१४ या कालावधीत राज्य गुणवत्ता नियंत्रकाच्या पूर्ण झालेल्या ४२६ कामाची तपासणी केली तेव्हा ४ रस्त्यांची गुणवत्ता असमाधानकारक असल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच त्याच कालावधीत सुरु असलेल्या १ हजार ३९६ कामापैकी ७ टक्के कामे निकृष्ट झाल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार पंतप्रधान ग्रामसडक योजनेतील अपूर्ण कामे तातडीने करणेबाबत तसेच पूर्ण झालेली कामे दर्जेदार व गुणवत्ताधारक होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे,

प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेतील माहे डिसेंबर, २०१४ अखेरच्या अपूर्ण कामांची संख्या ९९२ इतकी आहे. राज्य गुणवत्ता नियंत्रकांनी ४ कामांबद्दल असमाधानकारक शेरे नमूद केले आहेत.
(२) तपासणीत ही ७ टक्के काम निकृष्ट दर्जाची आढळून आलेली नसून, त्यातील त्रुटींमुळे त्या कामांना असमाधानकारक असा शेरा देण्यात आलेला आहे.
(३) व (४) प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात त्रिस्तरीय गुणवत्ता संनियंत्रण तपासणी पध्दती राबविण्यात येते. या कार्यपध्दतीनुसार गुणवत्ता नियंत्रकांच्या तपासणीत ज्या त्रुटी आढळून येतात त्यानुसार त्या कामांची समाधानकारक, समाधानकारक परंतू सुधारणा आवश्यक व असमाधानकारक अशी वर्गवारी होते.

कामांमधील त्रुटींबाबत कंत्राटदाराच्या खर्चाने सुधारणा करुन संबंधित कार्यकारी अभियंता त्याचा कार्यपुर्तता अहवाल तयार करतात व ते राज्य गुणवत्ता समन्वयक यांच्याकडे सादर केले जातात. या कार्यपध्दतीनुसार वरील कामांच्या गणुवत्तेत आढळून आलेल्या त्रुटींच्या कार्यपुर्ततेचा अहवाल संबंधित कार्यकारी अभियंता यांनी राज्य गुणवत्ता समन्वयक यांच्याकडे सादर केलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मनोरा (जि.वाशिम) तालुक्यात रस्त्यांच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(६३) * ३३०८ श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनोरा (जि.वाशिम) तालुक्यातील पोरा देवी येथे जगभरातून येणा-या भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून डी.पी.डी.सी. अंतर्गत रस्ता बांधण्यात आला असता सदर रस्त्याचे काम पोहरादेवी-सिंगद, पोहरादेवी-उमरी, धावंडा-वाईगौळ, पंचाळा फाटा ते पोहरादेवी, शेंदोना-उमरी इत्यादी ठिकाणी परीपूर्ण व योग्य प्रकारे कामे न करताच बील मात्र पूर्णपणे उचल केल्याचे दिनांक २ जून, २०१३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ताचे मोजमाप हे क्वॉलिटी कंट्रोलच्या अधिका-यांच्या संगनमताने झाल्याने या ठिकाणी गैरव्यवहार झाला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, दोषी अधिका-यांवर शासन कार्यवाही करणार आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विदर्भातील सर्व जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक वाढविण्याबाबत**

**(६४) * ३८४२ श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्ह्याचा समतोल विकास साधण्याच्या दृष्टीने दरवर्षी विकास नियोजन आराखडा केला जातो. त्यानुसार सन २०१४-१५ या वर्षाचा विकास आराखडा तयार केला आहे तथापी निधीअभावी अनेक कामे रखडली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याचा सरासरी मानव विकास निर्देशांक हा ०.७५२ असून विदर्भातील नागपूर जिल्ह्याचा निर्देशांक सोडल्यास बाकी सर्व जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक सरासरीपेक्षा प्रचंड कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील या सर्व जिल्ह्यांचा सरासरी मानव विकास निर्देशांक वाढविण्याकरिता या जिल्ह्यांतील साधनांचा (रस्ते, पुल, आरोग्य सुविधा) अनुशेष भरुन काढणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुशेष भरुन काढण्याकरिता पद भरतीचा अनुशेष भरुन काढणे अत्यावश्यक असून या पदभरतीमध्ये स्थानिक रहिवाशींना प्राधान्य देण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेचा प्रारूप आराखडा दरवर्षी जिल्ह्यांच्या जिल्हा नियोजन समितीद्वारे तयार करण्यात येतो. सदर प्रारुप आराखडे विहित निकषानुसार अंतिम करण्यात येतात. त्यानुसार सन २०१४-१५ च्या सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेचे आकारमान रु. ५९०२ कोटी असून सदरचा अर्थसंकल्पित केलेला निधी जिल्ह्यांना पूर्णपणे वितरित करण्यात आला आहे. त्यामुळे निधी अभावी कामे रखडली असे म्हणणे संयुक्तिक नाही.

(२) सन २०११ साठी महाराष्ट्र राज्याचा सरासरी मानव विकास निर्देशांक ०.७५२ आहे. या निर्देशांकाशी विदर्भातील १० जिल्ह्यांची तुलना केल्यास मानव विकास निर्देशांकाचा सापेक्ष स्तर हा वाशिम व गडचिरोली जिल्ह्यांचा निम्न स्तरावर, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, भंडारा, गोंदिया व चंद्रपूर या सहा जिल्ह्यांचा मध्यम स्तरावर, अकोला व वर्धा जिल्ह्यांचा उच्च स्तरावर आणि नागपूर जिल्ह्याचा उच्चतम स्तरावर आहे. यावरुन विदर्भातील जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक प्रचंड कमी नसून राज्याच्या सरासरी निर्देशांकाच्या तुलनेत थोडास कमी आहे.

(३) मानव विकास निर्देशांक प्रामुख्याने पुढील बाबींवर काढण्यात येतो.

(१) शिक्षण

(२) आरोग्य व

(३) आर्थिक स्थिती

मानव विकास निर्देशांक वाढविण्याच्या दृष्टीने जिल्ह्याची योजना तयार करतांना पुरेशी तरतूद करण्याबाबत सर्व जिल्ह्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद शहरातील शिवशंकर कॉलनी परिसरातील बाबासाई एडसग्रस्त मुलां-मुलीचे बालगृहाला अनुदान प्राप्त होण्याबाबत**

**(६५) * ४६७७ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील शिवशंकर कॉलनी परिसरातील बाबासाई एडसग्रस्त मुलां-मुलीचे बालगृहाला शासनाकडून गेल्या दोन वर्षापासून नियमित अनुदान मिळाले नसल्याची बाब दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदान न मिळाल्यामुळे अनाथ, निराधार बालकांची उपासमार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदान न मिळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, अनुदान देण्याबाबत शासनाकडून कोणती तातडीची कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

सदर संस्थेस सन २०१२-१३ मध्ये रु.३,८८,०००/- सन २०१३-१४ मध्ये रु.४,२५,५४४/- अनुदानापोटी उपलब्ध करुन दिलेले आहेत. त्याचप्रमाणे सन २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ या तीन वर्षासाठी मूल्यनिर्धारण फरक रु.९२,६०९/- तसेच सन २०१३-१४ मध्ये मागील मूल्यनिर्धारण देय असलेले रुपये १,४३,७२१/- इतके सहाय्यक अनुदान अदा करण्यात आलेले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील पत्रकारांना वैद्यकीय सुविधा देण्याबाबत**

**(६६) * ४२१५ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टिव्ही जर्नालिस्टस् असोसिएशनने (टिव्हीजीए) मुंबई पत्रकार संघात घेतलेल्या आरोग्य शिबिराचे उद्घाटन करताना पत्रकारांना वैद्यकीय सुविधा देण्याचे प्रयत्न करण्याचे आश्वासन मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी दिनांक ११ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही करण्यात केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

(२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, दिनांक २५.८.२००९ अन्वये राज्यातील अधिस्विकृतीधारक पत्रकारांना शासकीय रूग्णालयातून विनाशुल्क उपचाराची सवलत शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आदिवासी, मागासवर्गीय, घटकांना केंद्र व राज्य सरकारच्या अनुदानातून राबविण्यात येणाऱ्या योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(६७) * ४५६९ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घरात सरपणाला लाकडूफाटा लागत असल्याने जंगलाचा रास होवू नये म्हणून २०१० पासून केंद्र व राज्य सरकारच्या १०० टक्के अनुदानातून आदिवासी, कातकरी, मागासवर्गीय, घटकांना आदिवासी विकास प्रकल्पातून १०० टक्के अनुदानित व संयुक्त वन विभागाच्या २५ टक्के लाभार्थ्यांचे व ७५ टक्के शासनाच्या निधीतून ७ हजार रुपये किंमतीचे अशा या २ विभागामार्फत एक योजना राज्यात राबविण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) पालघर जिल्ह्यातील मुरबाड तसेच अन्य आदिवासी तालुक्यातील आदिवासींना मिळणारे गॅस सिलेंडर आदिवासी कातकरीच्या झोपडीत जाण्याऐवजी हॉटेल, महामार्गावरील चायनीस गाड्या, ढाब्यावर तसेच धनदांडग्यांच्या घरात जळत असल्याचे भीषण वास्तव अलीकडेच (डिसेंबर, २०१४-जानेवारी, २०१५) निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) गॅस सिलेंडरचे लाभार्थी निवडताना अधिकारी वर्ग, वनविभाग, आदिवासी विभाग ज्या लाभार्थीची निवड करते त्यांना अगोदर १ हजार ते १५०० रुपये मोबदला देवून त्यांच्या नावे घेतलेला सिलेंडर वाढीव भावात व्यावसायिकांना विकला जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंपूर्ण गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशतः खरे आहे.
(२) खरे नाही.
(३) खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयातील दुरवस्था दूर करणेबाबत**

**(६८) * २८०० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात डॉक्टर व अन्य कर्मचाऱ्यांची रिक्त पदे, अपुऱ्या खाटा तसेच बंद असणारे विविध विभाग, खाजगी व्यवसाय करणारे वैद्यकिय अधिकारी यांच्यामुळे सदर रुग्णालयाची दुरवस्था झालेली असल्याने त्यात सुधारणा करण्याबाबतची मागणी मराठवाडा जनता विकास परिषदेच्या परभणी शाखेने मा.आरोग्यमंत्री यांच्याकडे सन २०१५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयात अत्याधुनिक सुविधा देण्याबाबत व वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.
(२) जिल्हा सामान्य रुग्णालय, परभणी येथे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वर्ग-१) संवर्गाची १८ पदे मंजूर असून त्यापैकी ७ पदे भरलेली व ११ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची ३५ पदे मंजूर असून तेथे ३० स्थायी, ३ अस्थायी व २ बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. गट-क ची २५८ पदे मंजूर असून २१४ पदे भरलेली आहेत. गट-ड ची १९१ पदे मंजूर असून १३३ पदे भरलेली आहेत.

उपलब्ध ४०६ खाटा आणि वैद्यकीय अधिका-यांमार्फत रुग्णांना आवश्यक ती रुग्णसेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

वैद्यकीय अधिकारी वर्ग-१ ची रिक्त पदे नामनिर्देशनाने व पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत स्वतंत्र निवड मंडळामार्फत कार्यवाही सुरु आहे, तसेच वैद्यकीय अधिका-यांच्या रिक्त पदांवर कंत्राटी पध्दतीने नेमुणका देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून त्यानूसार कार्यवाही करण्यात येत आहे.

गट- क व ड कर्मचा-यांची रिक्त पदे स्थायी स्वरुपात भरण्याबाबत क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बाऱ्हाळी (ता.मुखेड, जि.नांदेड) येथील रोजगार हमी योजनेच्या कामावर बोगस कामगार दाखवून केलेला गैरव्यवहार

**(६९) * ४४०३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाऱ्हाळी (ता.मुखेड, जि.नांदेड) या गावातील रोजगार हमी योजनेच्या कामावर बोगस कामगार दाखविण्यात येवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच गरीब कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशतः खरे आहे.

(२), (३) व (४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मौ.बा-हाळी, ता.मुखेड, जि.नांदेड येथील कामांची तपासणी, तहसिलदार मुखेड व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुखेड यांनी दि.१३ जानेवारी, २०१५ रोजी करुन मजूर उपस्थित नसल्याचा व जॉब कार्ड नसल्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी नांदेड यांना सादर केला आहे. सदर अहवालानुसार या कामांची सविस्तर चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय अधिका-यांच्या दक्षता पथकाची नेमणूक केली असून याबाबतचा सविस्तर चौकशी अहवाल २ महिन्यांत पुर्ण करुन सादर करावयाच्या सूचना जिल्हाधिकारी नांदेड यांनी दिल्या आहेत. त्यानुसार जिल्हा दक्षता पथकामार्फत याप्रकरणाबाबत चौकशीची प्रक्रीया सुरू आहे.

चौकशी अहवाल प्राप्त होताच संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

दि.०७.०३.२०१५ अखेरच्या साप्ताहिक मजूर उपस्थिती अहवालानुसार नांदेड जिल्ह्यांमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ८६२ कामांवर १६,९९५ एवढे मजूर उपस्थित आहेत. तसेच ग्रामपंचायत स्तरावर ८,४८५ तर यंत्रणेअंतर्गत ५,९१३ अशी एकूण १४,३९८ एवढी कामे शेल्फवर आहेत.

मुखेड तालुक्यामध्ये ग्रामपंचायतीची ९६४ व यंत्रणेची २५४ अशी एकूण १,२१८ एवढी कामे शेल्फवर असून, मौजे बा-हाळी येथे, ०१ सीसीटी व ०१ सीबीचे काम शेल्फवर आहे.

कामाच्या मागणीनुसार मजुरांना या योजनेअंतर्गत कामे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

-----------------

**माळशिरस, पंढरपूर, सांगोला आणि मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात सिंमेंट बंधा-याची कामे निकृष्ट दर्जाची करून लाखो रुपयांचा केलेला गैरव्यवहार**

**(७०) * ५८९८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस, पंढरपूर, सांगोला आणि मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात जिल्हा परिषद अंतर्गत लघु पाटबंधा-याची कामे करताना सदर तालुक्यात सिंमेंट बंधा-याची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची करून तेथील उपअभियंता, शाखा अभियंता व ठेकेदार यांनी कार्यकारी अभियंता श्री.नाईकवरे यांना हाताशी धरुन सन २०१२ -२०१३ मध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माळशिरस पंचायत समितीचे सदस्य श्री.के.के. पाटील आणि फडतरी, ता.माळशिरस, जि.सोलापूर येथील ग्रामपंचायत सदस्य श्री.हनुमंत रुपनवर यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे सन २०१४ मध्ये तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले,

(४) सदर, प्रकरणात दोषी असणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

अशा प्रकारचे निवेदन आढळून आलेले नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळांमधील कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत**

**(७१) * ५६८७ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डेंग्यू, मलेरिया, काविळ या आजारांचा राज्यात प्रादुर्भाव वाढत असल्याने आजारांचे निदान करणाऱ्या नंदुरबार, वाशिम, गोंदिया, हिंगोली येथील सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळांमधील कर्मचाऱ्यांना आठ महिन्यांपासून वेतन न मिळाल्यामुळे अधिकारी व कर्मचारी यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे दिनांक १८ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते त्वरीत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, वाशिम, नंदूरबार, गोंदिया व हिंगोली या प्रयोगशाळामधील पदांना दिनांक ६ मार्च, २०१३ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली असून या चार नवनिर्मित प्रयोगशाळांमधील मंजूर पदांचे वेतन व भत्ते अदा करण्यासाठी संचालनालय लेखा व कोषागारे संगणक शाखा महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या कडून आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक घेणे तसेच सर्व पदांची माहिती BEAMS प्रणाली मध्ये नोंदविणे आवश्यक असल्यामुळे माहे जून २०१४ ते डिसेंबर २०१४ या कालावधीत सदर चार प्रयोगशाळांमधील कर्मचा-यांचे वेतन अदा करण्यास अडचणी आल्या, हे खरे आहे.

(२) व (३) सध्या कार्यरत असलेल्या सर्व कर्मचा-यांचे थकीत वेतन डिसेंबर २०१४ व जानेवारी २०१५ मध्ये अदा करण्यात आले असून सद्यःस्थितीत नियमितपणे वेतन अदा करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यात मुलींच्या शिक्षण आणि विवाहासाठी अल्पबचतीला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष मोहिम राबवण्याबाबत**

**(७२) * ५९४२ श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुलींच्या शिक्षण आणि विवाहासाठी अल्पबचतीस प्रोत्साहन देण्यासाठी सुकन्या समृद्धी खाते या विशेष गुंतवणूक योजनेत राज्यातील १० जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे, दरहजारी ९१८ पेक्षा कमी दर असलेल्या या जिल्ह्यांमध्ये २०१५ मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी विशेष मोहिम राबविली जाणार असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलींच्या नावावर उघडलेल्या समृद्धी खात्यावर ९.१ व्याजदर आणि करबचत प्रस्तावित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्ह्यांत मुलींचा घटता जन्मदर तसेच समाजातील लिंग गुणोत्तराचे विषम प्रमाण लक्षात घेवून शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) 'बेटी बचाओ-बेटी पढाओ' या केंद्र पुरस्कृत अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्यातील १० जिल्ह्यांची निवड करण्यांत आली असून सदर जिल्ह्यांकडून अभियानांतर्गत सन २०१४-१५ ते २०१६-१७ पर्यंत घ्यावयाचे कार्यक्रमाबाबत भौतिक व आर्थिक आराखडा केंद्र शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

"सुकन्या समृध्दी खाते" ही विशेष गुंतवणुक योजना "बेटी बचाओ-बेटी पढाओ" अभियानाचा भाग असून ती योजना केंद्र पुरस्कृत आहे. सदर योजना १० वर्षापर्यंतच्या मुलींना लागू आहे. दिनांक ०१.१२.२०१५ पर्यंत खाते उघडून या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

(२) होय.

(३) व (४) "बेटी बचाओ-बेटी पढाओ"अभियानांतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार महाराष्ट्रातील १० जिल्ह्यांत खालीलप्रमाणे उपाययोजना सुरू आहे.

अ) लिंगभेदावर आधारित लिंग निवड प्रथा निर्मुलन करणे.

ब) बालिकेच्या जिवीताची हमी घेणे किंवा खात्री असणे.

क) बालिकेच्या शिक्षणाची हमी किंवा खात्री असणे.

-----------------

**खामगांव (जि.बुलढाणा) या परिसरात जलसंधारणाच्या कामांना मंजुरी मिळणेबाबत**

**(७३) * ४०४७ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) परिसरात जलसंधारणाची कामे मंजुर करण्याबाबत VIIDP च्या DPR-४ चा निधी मागणीचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर VIIDP च्या DPR-४ च्या प्रस्तावाला तात्काळ मंजुरी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, याप्रकरणी विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) DPR-४ शासनास प्राप्त आहे.

(२) या कार्यक्रमांतर्गत लघु सिंचन (जलसंधारण) अंतर्गत आतापर्यंत ५९६२ योजनांच्या रु. ९३३.१९ कोटी किंमतीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) शासनाने मंजूरी दिली आहे. या कार्यक्रमांतर्गत निर्मित दायित्व व केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीच्या अनुषंगाने पुढील सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मंजूरीची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सिंधुदुर्ग जिल्हयातील वैभववाडी, कुडाळ व कणकवली तालुक्यात**
**रानटी हत्तींनी केलेले नुकसान**

**(७४) * ३०३७ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी, कुडाळ, कणकवली तालुक्यात (जि.सिंधुदुर्ग) रानटी हत्तींनी माड-बागायती आणि केळी या झाडाचे मोठया प्रमाणात नुकसान केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील परिसरात वावरणाऱ्या हत्तींनी तेथील शेतांची नासधूस केल्याचे तसेच अनेक ग्रामस्थ व लहान बालकांवर प्राणघातक हल्ले केल्याच्या तक्रारी गेल्या २ वर्षांपासून तेथील ग्रामस्थांकडून संबंधित जिल्हाधिकारी, जिल्हा वनसंरक्षक व प्रधान सचिव, वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या बागायतीचे मोठया प्रमाणात केलेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येवूनही शेतकऱ्यांना अद्यापी नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच रानटी हत्तींना आळा घालण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच हत्तींकडून शेतांचे होणारे नुकसान व ग्रामस्थांवर होणारे प्राणघातक हल्ले टाळावेत म्हणून हत्तींसाठी शासनाने सिंधुदुर्ग जिल्ह्यात "हत्ती सेंच्युरी" (Elephant Sanctuary) निर्माण करावी, अशीही मागणी संबंधित ग्रामस्थ व स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१४ पासून ते माहे जानेवारी, २०१५ अखरेपर्यंत जिल्हाधिकारी, रत्नागिरी / सिंधुदूर्ग तसेच मा.पालकमंत्री, रत्नागिरी / सिंधुदुर्ग यांचेकडे निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, त्यानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यात हत्ती सेंच्युरी (Elephant Sanctuary) निर्माण करण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : (१) सिंधुदूर्ग जिल्ह्यात माहे जानेवारी, २०१५ मध्ये कुडाळ, कणकवली, वैभववाडीतील १२० प्रकरणात वन्य हत्तीने रु.१५,०४,५९९/- एवढे शेती / बागायतीचे नुकसान केल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) पीक नुकसानी प्रकरणी शासन निर्णय दिनांक ०५.०९.२०१३ च्या तरतूदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतक-यास नुकसान भरपाई अदा करण्यात येते. सिंधुदूर्ग जिल्ह्यात डिसेंबर, २०१४ अखेर नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई अदा करणेत आली आहे. वन्य हत्तींमुळे झालेल्या नुकसान भरपाईची मागील दोन महिन्यातील रु.३४.५९ लक्ष रकमेची प्रकरणे अनुदानाअभावी प्रलंबित आहेत.

वन्य हत्तींचा कायम स्वरुपी बंदोबस्त करण्याकामी कर्नाटक राज्यातील प्रशिक्षित हत्ती व तज्ज्ञ अधिका-यांच्या सहाय्याने दिनांक ०८.०२.२०१५ ते दिनांक १६.०२.२०१५ या कालावधीत वन्य हत्ती पकडण्याची मोहिम राबवून तीन वन्य हत्तींना पकडून आंबेरी ता.कुडाळ येथे क्रॉल मध्ये बंदिस्त करण्यात आले आहे.
(५) हे खरे आहे.
(६) तज्ज्ञांच्या मते हत्तींचे दीर्घकालीन संवर्धन करण्यासाठी त्यांची पुरेशी संख्या असणे, जवळपास चारशे-साडेचारशे चौ.कि.मी. क्षेत्राची उपलब्धता असणे या गोष्टींची आवश्यकता आहे. सिंधुदूर्ग जिल्ह्यात तशी अनुकूल परिस्थती नाही. त्यामुळे सद्यस्थितीत हत्ती अभयारण्य निर्माण न करता कुडाळ तालुक्यातील तीन वन्य हत्तींना पकडण्यात आले आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिरसमार्ग, ममदापूर, नागापूर (जि.बीड) येथे कायमस्वरुपी तालुकास्तरीय विक्री केंद्राचे बांधकाम करण्याबाबत**

**(७५) * ३६४८ श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक २३ ऑक्टोबर, २०१३ व दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या आदेशान्वये बीड जिल्ह्यातील सिरसमार्ग, ममदापूर, नागापूर येथे तालुकास्तरीय कायमस्वरुपी विक्री केंद्र बांधण्यास परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामविकास विभागाच्या दिनांक २१ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या आदेशान्वये रु. २५ लक्ष खर्चाच्या मर्यादेत नविन टाईप प्लान तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाचा तालुका विक्री केंद्र इमारत बांधकामाचा नविन टाईप प्लान तयार झाला आहे काय, त्यानुसार उक्त उल्लेखित कामांना मंजुरी दिली आहे काय,

(४) असल्यास, उक्त उल्लेखीत ठिकाणी विक्री केंद्राचे बांधकाम केंव्हा सुरू होणार आहे,

(५) नसल्यास, वरील प्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,

शासन निर्णय **दिनांक ११.०८.२००९** अन्वये **मौजे गढी ता.गेवराई** येथे विक्री केंद्र बांधण्यास परवानगी देण्यात आली होती. तथापि मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बीड यांचे शिफारशीनुसार यात बदल करुन शासन पत्र क्रमांक **ताविके २०१३/प्र.क्र.६१/योजना-१ दिनांक २३.१०.२०१३** अन्वये **सिरसमार्ग ता.गेवराई जि.बीड** येथे विक्री केंद्र बांधण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) होय.

कायमस्वरुपी तालुकास्तरीय विक्री केंद्राचा नविन नमुना आराखडा (Type Plan) तयार करण्यात आला असून याप्रमाणे बांधकाम करण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१४-१५ च्या दर सूचीनुसार (DSR) किती खर्च अपेक्षित आहे याबाबतचे अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडून मागविण्यात आलेले आहे.

-----------------

**नाशिक येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयातील सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्याबाबत**

**(७६) * ५२४६ डॉ.अपूर्व हिरे : ता.प्र.क्र. ११५१ ला दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाकरीता ३६७ कर्मचारी यांचा आकृतीबंध निश्चित करण्यांत येवून त्यापैकी ३०९ पदे भरण्यात आलेली असून सद्यस्थितीत ५८ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयासाठी आकृतीबंधाव्यतिरिक्त अतिरिक्त स्वरुपात वैद्यकिय व शुश्रुषा संवर्गातील परिचारिकांची पदे नव्याने निर्माण करुन सदर पदे भरणेबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील प्रस्तावावर शासनाचा विचार पुर्ण झाला असल्यास त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, नागरिकांचे आरोग्य विषयक सुविधांचा विचार करता रुग्णालयातील रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) नाशिक येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाकरीता ३६७ पदांचा आकृतीबंध दिनांक १५.११.२००६ अन्वये निश्चित करण्यात आला आहे. आजमितीस त्यापैकी २८९ पदे भरलेली असून ७८ पदे रिक्त आहेत.
(२) व (३) होय.
(४) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहेत
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील वनक्षेत्रपाल टोकावडे विभागातील बंधाऱ्यांमधील गाळ काढण्याबाबत

**(७७)** * **३८६५** **श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील वनक्षेत्रपाल टोकावडे विभागात गेल्या दोन वर्षामध्ये ३५ ते ४० सिमेंटचे व मातीचे बंधारे बांधण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या दोन वर्षात या बंधाऱ्यांच्या बांधकामासाठी किती रक्कम खर्च करण्यात आली,
(३) असल्यास, या सर्व बंधाऱ्यामधील पाणी साठा किती कालावधीपर्यंत साठविला जातो,
(४) असल्यास, वरील बंधाऱ्यातील गाळ काढणे, देखभाल करणे यासाठी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात किती रक्कम खर्च करण्यात आली आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) बाबत सन २०१२-२०१३ यावर्षी ७ तसेच सन २०१३-२०१४ या वर्षी १८ असे एकूण २५ वनबंधारे (सिमेंट) बांधण्यात आले आहेत. त्याकरिता रु.२४०.९४ लक्ष इतका खर्च आलेला आहे.
(३) बहुतांश बंधा-यांमध्ये बारमाही पाणीसाठा टिकून राहतो.
(४) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात गाळ काढणे अथवा देखभाल करणे या करिता खर्च करण्यात आलेला नाही.

-----------------

**मुंबई-गोवा महामार्गावर अपघात झाल्यास तातडीने उपचार मिळावेत म्हणून वडखळ नाक्यावर ट्रामा सेंटर उभारण्याबाबत**

**(७८) * ४७४२ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावर अपघात झाल्यास तातडीने उपचार मिळावेत म्हणून वडखळ नाक्यावर ट्रामा सेंटर उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १७ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयान्वये सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारीत राज्यात आरोग्य संस्था स्थापनेचा बृहत आराखडा मंजुर केलेला आहे. त्यामध्ये वडखळ नाका येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय व २० खाटांचे ट्रामा केअर युनिट स्थापन करण्यास मान्यता दिलेली आहे. सदर ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर युनिटच्या बांधकामासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करणबाबतची कार्यवाही चालु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर, गडचिरोली व कोल्हापूर जिल्हयात वाघ व बिबटयांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(७९) * ४००४ श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती शोभाताई फडणवीस, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात मागील दोन वर्षामध्ये तीन वाघ व दोन बिबटयांचा कठडे नसलेल्या विहीरीत पडून मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच चार्मोशी (जि.गडचिरोली) येथे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास एका वाघिणीचा संशयास्पद स्थितीत मृत्यू झाला, त्यानंतर ताडोबा संरक्षित क्षेत्रातील शिवणी येथे दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास विहिरीत पडून वाघीण मृत्यूमुखी पडली, मुघोली येथे वयस्क वाघिणीचा मृतदेह मिळाला त्यानंतर अवघ्या दीड महिन्याच्या अंतराने तीन वाघिणींचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शिराळा (जि.कोल्हापूर) येथे जेरबंद केलेल्या बिबट्याचा मृत्यू तीन दिवसाच्या उपासमारीमुळे व लोकांच्या गोंधळामुळे झाला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाघांची व बिबटयांची संख्या घटण्याची शक्यता असल्याची चिंता ताडोबाचे पशुवैद्यकीय अधिकारी यांनी व्यक्त केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार वाघांच्या व बिबट्यांच्या सुरक्षिततेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मागील दोन वर्षात चंद्रपूर जिल्हयात तीन बिबट व एका वाघाचा विहीरीत पडून मृत्यू झाला आहे.

(२) दिनांक १२.११.२०१४ रोजी चार्मोशी येथे एका वाघिणीचा संशयास्पद स्थितीत, दिनांक १६.१२.२०१४ रोजी ताडोबा संरक्षित क्षेत्रातील विहिरीत पडून एका वाघिणीचा मृत्यू झाला आहे. तसेच ताडोबा-अंधारी बफर क्षेत्रातील मोहर्ली परिक्षेत्र, मुधोली-काटवल-चंदनखेडा रस्त्याच्या बाजुला सर्व्हे नं. ६५ मध्ये वयस्क वाघिणीचा मृतदेह मिळाला आहे. त्यानंतर दीड महिन्याच्या कालावधीत चार बिबटयांचा मृत्यू झाला आहे.

(३) हे खरे नाही,

सदर बिबटयाचा मृत्यू हा न्युमोनिया या रोगाने झाल्याचे पशुवैद्यकीय अधिकारी, वर्ग-१ बिळाशी यांच्या दिनांक ०४.०२.२०१५ चे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली येथे जिल्हा प्रेक्षागार मैदानालगत शेडचे बांधकाम निविदा न काढता करण्यात येत असल्याबाबत

**(८०)** * **२९५६ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली येथील जिल्हा प्रेक्षागार मैदानालगत लाखो रुपयांचे शेडचे बांधकाम कुठलीही निविदा न काढता वनविभागामार्फत करण्यात येत असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन शासनाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) वन विभागाद्वारे गडचिरोली येथे हस्तकला मूल्यवर्धी प्रशिक्षण केंद्राच्या शेडचे आकार पोलीस विभागात बांधलेल्या शेड प्रमाणेच असल्याने, पोलीस विभागाने वृत्तपत्रामध्ये जाहीरात देवून, ई-टेंडर पद्धत वापरुन केलेल्या निविदा प्रक्रीयेच्या आधारे आणि त्यानुसार मंजूर केलेल्या कमीत-कमी रकमेच्या निविदा धारकास शेड पुरविण्याचे आदेश देण्यात आले. यामध्ये, कोणतीही अनियमितता झालेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डोंबिवली जवळील आजदे ग्रामपंचायतीमार्फत एमआयडीसीच्या परिसरात टाकलेल्या कचऱ्यामुळे वायू प्रदूषण होत असल्याबाबत**

**(८१) * ५५५० ॲड.अनिल परब :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजदे (डोंबिवली) ग्रामपंचायतीमार्फत एमआयडीसीच्या परिसरात टाकलेल्या कचऱ्यामुळे वायू प्रदूषण होत असल्याने आजदे गाव व निवासी विभागातील घनकचरा एमआयडीसीच्या डंपींग ग्राऊंडवर टाकण्यास मा.पर्यावरण राज्यमंत्री यांनी दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास बंदी घातली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंदीमुळे आजदेगांव ग्रामपंचायत आणि एमआयडीसी यांच्यातील वाद चिघळला असून कचऱ्याची विल्हेवाट लावयाचा प्रश्न ग्रामपंचायती समोर उभा राहिलेला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

मा.पर्यावरण राज्यमंत्री यांनी दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी भेटीवेळी एम.आय.डि.सी. ला दिलेल्या तोंडी सुचनेनुसार कचरा टाकण्यास बंदी घातली आहे.

(२) होय.

(३) व (४) घनकचरा शास्त्रशुध्द पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठीचा प्रकल्प कार्यान्वित करणेबाबत तसेच डंपींग ग्राऊंडसाठी पर्यायी जागा उपलब्ध करुन घेणेबाबतची कार्यवाही आजदे ग्रामपंचायतीमार्फत करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यातील उपकेंद्रामध्ये आरोग्य सेविकांच्या सोबत काम करणाऱ्या अंशकालीन परिचारिकांना मानधन देण्याबाबत**

**(८२) * ३९०६ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उपकेंद्रामध्ये आरोग्य सेविकांच्या सोबत काम करणाऱ्या ग्रामीण भागातील नागरीकांना आरोग्य सेवा पुरविणाऱ्या अंशकालीन स्त्री परिचारिकांना शासनाकडून केवळ १२०० रुपये मानधन देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिचारिकांनी किमान वेतनाप्रमाणे मानधन देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) अंशकालीन स्त्री परिचरांचे मानधनात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव संचालक आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचेकडून प्राप्त झाला असून शासनस्तरावर प्रस्तावाची छाननी करण्यात आला आहे.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील घाटंजी तालुक्यातील पारधी समाजास मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत**

**(८३) * ३३११ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटंजी तालुक्यातील (जि.यवतमाळ) पारधी समाज मोठया प्रमाणात असून अजूनही त्यांना मुलभूत सुविधा मिळाल्या नाहीत, भांबोरा येथील पारधी समाजाने वनजमिनीवर अतिक्रमण करुन वहिवाट करीत असलेल्या शेतजमिनीचे वनहक्क अंतर्गत दावे मिळावे याकरीता त्यांनी उपोषण करुनही व नियमानुसार वनहक्क अंतर्गत दावे न मिळाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील वन विभागाच्या गट क्र.४३ मध्ये १६ पारधी कुटूंबियांनी व इतर पारंपारीक १३ कुटूंबियांनी १९२६ पासून अतिक्रमण केल्याचे शासन दरबारी नोंद असूनही त्या जमिनीचे ७/१२ दिलेले आहेत, तरीही महसूल विभाग व वनविभागाच्या निष्काळजीपणामुळे ही जमिन वनविभागाची की महसूल विभागाची या कारणास्तव अतिक्रमणधारक पाटयापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सविस्तर चौकशी करुन पारधी समाजाला न्याय देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) उप विभागीय स्तरीय वनहक्क समितीला मौजा भांबोरा येथील एकूण ३१ दावे प्राप्त झालेली आहेत. त्यापैकी १३ दावे उपविभागीय स्तरीय समितीमार्फत जिल्हा स्तरावर प्रस्तावीत करण्यात आली होती. परंतू सदर दाव्यांचे प्रस्ताव परिपूर्ण नसल्यामुळे त्रुटी पूर्तते करीता परत उपविभागीय स्तरीय समितीला पाठविण्यात आलेली आहेत. त्रुटी पुर्तता अहवाल प्राप्त होताच १३ दाव्याबाबत मंजूरीची कार्यवाही करण्यात येईल.

तसेच उर्वरीत उपविभागीय स्तरीय समितीकडे असलेल्या १८ दाव्यांबाबत ७५ वर्षाचा रहीवासीबाबत व इतर पुरावे दाखल करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर १८ दावे व त्रुटी पुर्ततेसाठी पाठविलेली १३ दावे असे एकूण ३१ दाव्याचा प्रस्ताव जिल्हा स्तरीय समितीस प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यास येईल.

(२) हे अंशतः खरे आहे, मौजा भांबोरा येथील सर्व्हे क्र. ४३ चे एकूण क्षेत्र २४९ एकर १३ गुंठे होते. हे सर्व क्षेत्र शासनाने अधिसूचना क्र. ७७८ दिनांक १४.८.१९११ अन्वये सी क्लास स्टेट फॉरेस्ट घोषीत केले. त्यानंतर त्यातील १४४ एकर ९ गुंठे क्षेत्र अधिसूचना क्र. ३८/६८-पी, दिनाक २४.९.१९१७ अन्वये ए क्लास घोषीत केले, हे ए क्लास क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात आहे व उर्वरित १०५ एकर ४ गुंठे क्षेत्र अधिसुचना क्र. ७०/६८- अेडब्ल्यू, दिनांक २४.९.१९१७ अन्वये अराखीव असल्याने ते महसूल विभागाच्या ताब्यात आहे.

सदर महसूल विभागाच्या ताब्यातील क्षेत्राचे ७/१२ पारधी समाजातील १३ कुंटूंबियांना दिलेले आहे. परंतु त्यांनी दाखल केलेल्या दाव्यातील त्रुटी पूर्तता होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) उप विभागीय स्तरीय वनहक्क समितीकडील दाव्यातील त्रुटी पूर्तता होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल, त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अर्धवट असलेली जलसंधारणाची कामे

**(८४) * ४६७८ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या दोन जिल्ह्यात २५ हजार एकर सिंचन क्षेत्राची क्षमता असलेले जलसंधारण विभागाचे ७४ प्रकल्प अर्धवट अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, उक्त प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशतः खरे आहे.
रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ७३ योजनांच्या कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. यापैकी ९ योजना पूर्ण असून ५० योजनांचे काम प्रगतीपथावर आहे. १२ योजनांचे काम भूसंपदानामुळे सुरु नसून २ योजनांचे काम अन्य कारणामुळे सुरु नाही. या अपूर्ण ६४ योजनांची प्रकल्पीय सिंचन क्षमता ८८६६ हे. असून त्यापैकी ६९१ हे. सिंचन क्षमता निर्मित झालेली आहे व उर्वरीत ८१७५ हे. सिंचन क्षमता निर्माण होणे बाकी आहे.
(२) नाही, चौकशी केली नसल्याने प्रश्न उद्धवत नाही.
(३) निधीच्या उपलब्धतेनुसार व भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर योजनांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील शासकीय वसतीगृहातील मुले पळून जाण्याच्या घटनेबाबत

**(८५) * ४५९५ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर कॅम्प क्र.४ परिसरातील सरकारी वसतीगृहातील ४ मुले दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान अचानक गायब झाली असून याप्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हाही दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या वर्षात मुले पळून जाण्याची ही तिसरी घटना आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हासनगरातील वसतीगृहाची देखभाल व दुरुस्ती वेळेवर होत नसल्यामुळे मुले वारंवार पळून जाण्याच्या घटना घडत असल्याने सरकारी वसतीगृह प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती सरकारी वसतीगृहातून मुले पळून जाण्याच्या प्रकारास परिणामकारकरित्या आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशतः खरे आहे.

शासकीय मुलांचे बालगृह (कनिष्ठ) कुर्ला कॅम्प उल्हासनगर ४ या संस्थेतील दि. ०९ जानेवारी, २०१५ रोजी ४ प्रवेशित न सांगता निघून गेले आहेत. त्यापैकी १ प्रवेशिताचा शोध लागला असून त्यास पुन्हा संस्थेत दाखल करण्यात आले आहे.

याबाबत विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन, ठाणे येथे दि. १० जानेवारी, २०१५ रोजी तक्रार नोंदविलेली आहे.

(२) हे खरे आहे.

दि. १९.१०.२०१४ रोजी एक प्रवेशित व दि. २५.१०.२०१४ रोजी ४ प्रवेशित संस्थेतून न सांगता निघून गेले होते.

(३) सदर संस्थेचा परिसर २.७५ एकर इतका असून संरक्षक भिंत पडलेली आहे. संरक्षक भिंत दुरुस्त करण्यासाठीचा प्रस्ताव बांधकाम विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. तसेच, संस्थेतील काळजीवाहकाची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) होय.

(५) सदर घटनेच्या अनुषंगाने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, ठाणे यांनी संस्थेस तात्काळ भेट देऊन घटनेची सखोल चौकशी केलेली आहे. तसेच, प्रकरणी दोषी असलेले संबंधित अधिक्षक यांना कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आलेली आहे व काळजीवाहकाची अन्य संस्थेत बदली करण्यात आलेली आहे.

सदरची घटना पुन्हा घडणार नाही यासाठी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

प्रवेशित संस्थेतून निघून जाऊ नयेत म्हणून त्यांचे समुपदेशन, मार्गदर्शन इ. बाबत अंमलबजावणी करण्यात येत आहे.

-----------------

**परभणी जिल्ह्यातील कृषी विभागामार्फत करण्यात आलेल्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(८६) * २८०६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील कृषी विभागातर्फे मृदसंधारण, जलसंधारण, पाणलोट व इतर कामात कोट्यवधी रुपयांचा गैरप्रकार करणाऱ्या सर्व यंत्रणांची राज्यस्तरावरील विशेष भरारी पथकामार्फत चौकशी करुन कारवाई करण्यात यावी अशी मागणी मराठवाडा जनता विकास परिषदेच्यावतीने प्रधान सचिव, कृषी यांच्याकडे सन २०१५ च्या दरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक अधिकारी, कंत्राटदार, समित्या यांच्या संगनमताने केवळ कागदोपत्रीच करण्यात आलेल्या कोट्यवधी रुपयांच्या कामांची वरिष्ठ स्तरावरील पथकामार्फत चौकशी पूर्ण करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, दोषी कंत्राटदार, अधिकारी व यंत्रणा यांच्या विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) नाही. प्रस्तुत प्रकरणी चौकशीचे आदेश दिलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ट्री गार्ड खरेदीत लाखो रुपयांचा झालेला गैरव्यवहार**

**(८७) * ५८९९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सोलापूर-१ यांनी उपअभियंता, बी.डी.ओ. आणि ग्रामसेवक यांच्या संगनमताने सन २०१३-१४ मध्ये सोलापूर जिल्हा परिषद, ग्रामपंचायत विभागाच्या वतीने (पर्यावरण संतुलित ग्राम योजनेंतर्गत) ट्री गार्ड खरेदीत लाखो रुपयांचा गैरव्यवहार केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सोलापूर जिल्हा परिषदेचे पक्ष नेते श्री. संजय पाटील यांनी तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे सन २०१४ मध्ये तक्रार दाखल केलेली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती संबंधित दोषी असणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही,
(२) विरोधी पक्ष नेते जिल्हा परिषद सोलापूर यांनी सोलापूर जिल्ह्यात पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेअंतर्गत ट्री गार्ड खरेदी बाबत चौकशी करावयाचे निवेदन दिले आहे.
(३) होय,
(४) सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर व मंगळवेढा या दोन तालुक्यातील ४ ग्रामपंचायतींनी ट्री गार्ड खरेदी करणेबाबत विहित कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात आल्याचे दिसून येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **श्री. उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.